# नागपुरी तडका



गंगाधर मुटे 'अभय'

# नागपुरी तडका

गंगाधर मुटे 'अभय'

# अ.भा. मराठी शेतकरी साहित्य चळवळ

---

**नागपुरी तडका**


© **गंगाधर मुटे**


आर्वी (छोटी) ४४२३०७
ता. हिंगणघाट, जि. वर्धा
**भ्रमणध्वनी** : ९७३०५८२००४


| | | |
|---|---|---|
| **प्रकाशक** | : | अ.भा. मराठी शेतकरी साहित्य चळवळ |
| | : | आर्वी (छोटी) ४४२३०७ ता. हिंगणघाट, जि. वर्धा |
| **भ्रमणध्वनी** | : | ९७३०५८२००४ |
| **E-mail** | : | abmsss2015@gmail.com |
| **Web** | : | www.baliraja.com |
| **प्रथमावृत्ती** | : | २०/०२/२०१५ |
| **प्रकाशन क्रमांक** | : | ०२ |
| **मुद्रक** | : | |
| **अक्षरजुळवणी** | : | वसुंधरा प्रकाशन, नागपूर |
| **पुनर्मांडणी** | : | नयना जनार्दन म्हात्रे |
| **मुखपृष्ठ** | : | वसुंधरा प्रकाशन, नागपूर |
| **किंमत** | : | **रु. १००/-** |

तीर्थरूप बाबांस...

# नागपुरी तडका

''नागपुरी तडका'' हा एक नवीन काव्यप्रकार आहे. नागपूर आणि आसपासच्या काही जिल्ह्यांत जी मराठी भाषा बोलली जाते ती भाषा आणि भाषेचा लहजा, वऱ्हाडी किंवा झाडी बोलीभाषेपेक्षा पूर्णतः भिन्न आहे. त्यामुळे या बोलीभाषेतील रचनेला मी ''नागपुरी तडका'' असे स्वतंत्र नांव दिले आहे. पण या प्रकारात मी पूर्णतः निर्भेळ नागपुरी भाषेचा वापर करीत नाही. फक्त लहजा आणि काही वैशिष्ट्यपूर्ण शब्द यांचाच सीमित वापर करतोय आणि या काव्यप्रकाराचा आशय व उद्देश, न रुचणाऱ्या रूढी-परंपरा-चालीरीती, न रूचणारी सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय धोरणे यांचेवर टीकाटिप्पणीसह घणाघाती घाव घालणे हा उद्देश असल्याने या प्रकारास मी जाणीपूर्वक ''नागपुरी तडका'' असे नांव दिले आहे. या पद्यलेखनामध्ये मी ''अभय'' हे टोपणनाव/उपनांव, तखल्लुस/मक्ता म्हणून वापरले आहे.

आशा आहे की, वाचकांना हा काव्यप्रकार आणि कविता नक्की आवडतील.

**- गंगाधर मुटे ''अभय''**



# भूमिका

आता तयार व्हावे... लढण्यास लेखणीने
रक्षण अबोलतेचे... करण्यास लेखणीने

अभ्यास चिंतनाला... शास्त्रात घोळवावे
कसदार शब्दशेती फुलण्यास लेखणीने

वास्तव चितारण्याची अवगत कला करावी
भक्कम नवीन पाया... रचण्यास लेखणीने

नवज्ञान निर्मितेला... जेथे उभार तेथे
आशय हळूच न्यावा भिजण्यास लेखणीने

भाकड-वृथा कथांच्या कक्षेपल्याड जावे
अभिजात सृजनाला पुजण्यास लेखणीने

लटकी-पुचाट वाणी शिरजोर होत आहे
यावे रणात... गच्ची धरण्यास लेखणीने

जेव्हा चहूदिशांनी... वादळ विराट तेव्हा
द्यावे 'अभय' दिव्याला जळण्यास लेखणीने

# शेतकऱ्यांच्या लढ्याला वैचारिक बळ पुरवणारी कविता



जगातल्या सर्व वाङमय प्रकारात कवितेची मोहकता आणि दाहकताफविलक्षण मानली जाते. फूल हा सौंदर्याचा नि सुगंधाचा बोलका पुरावा आहे. झाड आणि वेलीचा विस्तार केवढाही असला तरी रसिकाचे लक्ष वेधण्याची शक्ती फक्त फुलाच्या सौंदर्यात असते. फूल म्हणजे सौंदर्याचा अर्क असतो, त्यात उणीव नाही दाखवता येत. कविता निखळ फुलासारखी असते. तिच्यात अनावश्यकतेला थारा नसतो. चमत्कारिक आशयसौंदर्याने कविता वाचकाला, रसिकाला वेधून घेते.

कविता केवळ सुंदर असते असे नाही. केवळ भद्र असते असेही नाही. कधी कधी रुद्रता हे कवितेचे सौंदर्यस्थळ असते. कवितेच्या सौंदर्याच्या आविष्कार एकाच रूपात अभिव्यक्त होत नाही. फुलाची मोहकता नि आगीची दाहकता उरात घेवून ज्या ज्या वेळी तिचा जसा मूड असेल तशी ती व्यक्त होत असते. कधी ती झाडाचे गर्द हिरवेपण दाखवतांना ती रसभरीत पानांसारखी असते. कधी प्रसन्नता आणि सौंदर्य सांभाळू न शकणाऱ्या फुलासारखी रंगोत्सवी असते. तर कधी ह्या रंगोत्सवाला जपणाऱ्या नि शोषणापासून वाचवू पाहणाऱ्या काट्यासारखी शस्त्रधारी असते. कवितेची रुपे अनेक आहेत.

आकाराने कविता सर्वात छोटा वाङमय प्रकार आहे, पण तिची आशयस्फोटकता अणुबॉम्ब सारखी आहे. जगातल्या शोषणाविरुद्ध सर्वात जास्त परिणामकारक भाष्य करण्याचे श्रेय जागतिक वाङमयात कवितेला जावे. इतका हा वाङमयप्रकार सुंदर आहे. वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट तालुक्यातील आर्वी (छोटी) या दूरवरच्या खेड्यात राहून कवितेची एकांत साधना करणारे कवी गंगाधर मुटे यांचा नागपुरी तडका हा नवा कवितासंग्रह मराठी वाचकांच्या भेटीला येत आहे. व्यवसायाने मुक्त पत्रकार असलेले मुटे सर हाडाचे शेतकरी आहेत. शेती आणि शेतकरी हाच त्यांच्या चिंतेचा आणि चिंतनाचा विषय आहे. विचार आणि आचार यात दरी वाढत असणारा हा काळ. अशा या काळात मुटेंनी कवी असणे आणि त्याचवेळी कार्यकर्ता असणे ही गोष्ट विशेष आहे. गजलेसारखा अरबी, उर्दू भाषेतून आलेला काव्यप्रकार प्रेयसी, प्रेम, विरह

अशा विषयांच्या परिघात गरगरत असतांना कविवर्य सुरेश भटांनी गजलेला सामाजिक भाष्याची भाष्यकार बनविले. पुढची एक मोठी पिढी विषय वैविध्य घेवून गजल लिहू लागली. या नव्या पिढीतील एक महत्त्वाचे नाव आहे कवी गंगाधर मुटे. मुटेंनी त्यांच्या जास्तीत जास्त गजलांच्या केंद्रस्थानी शेती, शेतकरी, त्याची वेदना, त्याचे शोषण आणि त्याची अस्मिता जागृती हाच राखला आहे, ही दखल घेण्यायोग्य गोष्ट आहे. माझी गजल निराळी या गजल संग्रहातून शेतकऱ्याला केंद्रस्थानी ठेवून लिहिली गेलेली गजल मराठी वाचकाला वाचायला मिळाली. या संग्रहाची नुकतीच दुसरी आवृत्ती निघाली आणि तिसरी आवृत्ती निघण्याच्या मार्गावर आहे.

एखादा गायक गाणं सुरू करण्यापूर्वी तानपुऱ्यावर आधी सा लावतो नि मग सप्तकात सुरांशी खेळतो. मुटे सरांची कविता सुद्धा शेतकऱ्यांच्या वेदनेचा सा लावल्याशिवाय सुरू होत नाही. संगीतातला सा जसा गाण्याला केंद्रापासून भरकटू देत नाही तसा शेतकऱ्यांच्या वेदनेचा सा मुटे सरांच्या कवितेला शेतकऱ्यांच्या दुःखावर सतत सतत भाष्य करायला भाग पाडतो. गजलेला अक्षर आणि मात्रा वृत्ताची शिस्त पाळावीच लागते, त्यामुळे गजलेत आशय बंदिस्त करतांना कवीला खूप स्वतःला जाचून घ्यावे लागते, प्रादेशिक छंदात अभिव्यक्त होतांना हा जाच तुलनेने कमी होतो. कारण अगदी सोपे आहे वृत्तात शिस्त आहे तर छंदात आनंद आहे.

मुटे सरांची नागपुरी तडक्यातली कविता छंदोबद्धतेचा मुक्त आविष्कार आहे. शेतकऱ्याचे शोषण, त्याची वेदना, अवतीभवतीच्या न रुचणाऱ्या जाचक अशा सामाजिक रूढी, परंपरा, चालीरीती, सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय धोरणे यांच्यावर मुटे यांची कविता आडून नव्हे तर थेट वार करते. भाष्य करते. कवितेचे शस्त्र आणि शास्त्र करून या सर्व व्यंग-विसंगतीवर घणाघाती टीका करते. या सर्वातून शेतकरी, कामकरी, मजूर, कामगार आणि एकूणच माणसाची निद्रिस्त अस्मिता जागवणे हे या नागपुरी तडका संग्रहातील कवितेचे मुख्य प्रयोजन आहे. नागपूर आणि आसपासच्या काही जिल्ह्यात जी मराठी भाषा बोलली जाते ती भाषा, तिचा लहेजा हा वऱ्हाडी किंवा झाडी बोलीभाषेपेक्षा पूर्णतः भिन्न आहे. त्यामुळे मुटे यांनी या कवितांना नागपुरी तडका असे स्वतंत्र नाव दिले आहे. तडका हा शब्द आस्वादात येणारा झणझणीत झटका या अर्थाने घेतला आहे. नागपुरी तडका या संग्रहातली

पूर्वार्धातली कविता वाचकाला आशयाचा झणझणीत झटका देते, आणि संग्रहाचे नाव सार्थ करते. हे वाचकांच्या लगेच लक्षात येईल.

अज्ञान, दारिद्र्य यामुळे अबोल रहाणारा परीणामी शोषणाचा विषय झालेला शेतकरी ज्या दिवशी तोंड उघडेल आणि निर्णयक्षम होईल त्यादिवशी शोषण करणाऱ्या सत्तेचा पाया खचेल, पण त्यासाठी शेतकरी बोलका झाला पाहिजे म्हणजे तो शिकला पाहिजे. अर्थात तो वर्तमानाला सकळ सामर्थ्यानिशी भिडेल इतका जाणता, समजदार झाला पाहिजे. यासाठी मुटेंची कविता पहिले आव्हान बळीला देते. बैल या सोशिक प्रतिमेचा अर्थपूर्ण वापर करतांना मुटे म्हणतात,

**बोल बैला बोल, तुला बोललंच पाहिजे;**
**बांधलेलं मुस्कं आता सोडलंच पाहिजे...**

दारिद्र्य, कर्जबाजारीपणा आणि अनेक कारणांनी आत्महत्येचा जीवघेणा पर्याय निवडणाऱ्या शेतकऱ्याला वैफल्याने इतके ग्रासले की त्याची अस्मिता उफाळून येण्यासाठी अतिशय नोकदार शब्दांची योजना करणे खूप आवश्यक आहे. तरच त्याच्या निद्रिस्त पुरुषार्थाला आली तर जाग येईल हे ओळखल्याने मुटे सर शेतकऱ्यांना जबरदस्त तडका देतांना लिहितात...

**बायल्यावाणी कायले मरतं? मर्दावाणी मर!**
**सरणावरून उठ आनं .... मशाल हाती धर**

**..........................................**

**ज्यांनी केली दुर्गती ... त्यांची यादी कर**
**एकटा नको मरु .. संग .. दहा घेवून मर**
**बायल्यावाणी कायले मरतं? मर्दावाणी मर!**

संग्रहातल्या या प्रातिनिधीक कवितांच्या व्यतिरिक्त असाच नागपुरी तडका देणाऱ्या झटकेबाज कविता या संग्रहात आहेत. त्या मुळातून वाचाव्या अशा आहेत. कवितेची वाङ्मय शेती फुलवत शेतकऱ्याच्या उज्ज्वल भविष्याचे स्वप्न पाहणारे मुटे सर या संग्रहातील पहिल्या गजलेत आपल्या लेखणीचे प्रयोजन सांगतात.

**अभ्यास चिंतनाला शास्त्रात घोळवावे;**
**कसदार शब्दशेती फुलण्यास लेखणीने...**

गजल, छंदोबद्ध कविता, मुक्तछंद, लावणी, गीत आणि बालगीत अशा सर्व रूपात मुटे यांची कविता या संग्रहात वाचकाला भेटते. निश्चित भूमिका, निश्चित विचार, निश्चित चिंतन घेवून मुटे यांची कविता वाचकांशी, रसिकांशी संवाद करते, भांडते, आवाहन करते तर कधी थेट आव्हान देते. सर्वांनाच विधायक आवाहन करतांना ते एका छान कवितेचा समारोप करतांना फार सुंदर ओळी लिहितात आणि त्यातून शोषणमुक्त समाजाचे एक छान शब्दचित्र आपल्यापुढे ठेवतात..

**माणूस म्हणून जन्मलात**
**तर माणसासारखे वागा**
**जरा तरी फुलवून पहा**
**सौजन्याच्या बागा**

बळीराजा डॉट कॉम, गंगाधर मुटे डॉट कॉम अशासारख्या वेबसाईट्सच्या माध्यमातून शेतकऱ्यांविषयीचे अभ्यासपूर्ण विचार, मते, कविता, गजल वैश्विक व्यासपीठावर मांडणारे कवी गंगाधर मुटे यांची वाङमयीन शेती रसिक वाचकांच्या दाद आणि प्रतिसादातून नक्कीच सुजल सुफल होईल. नागपुरी तडकातील कविता शेतकऱ्यांविषयीच्या लढ्याला वैचारिक बळ पुरवेल. अशी मला खात्री आहे.

**– कमलाकर देसले**
माऊली निवास, झोडगे
ता. मालेगाव, जि.नाशिक

# अनुक्रमणिका


**नागपुरी तडका**

०१) हाण त्याच्या टाळक्यात
०२) स्वदेशीचे ढोंगधतूरे
०३) गोवंशाला अभय द्या
०४) बिपाशाले लुगडं
०५) कुठे बुडाला चरखा?
०६) छातीचं झाकण बोम्लीवर आलं
०७) पलंब मोडून व्हता
०८) बोल बैला बोल
०९) धोतर फाटेपाव्तर
१०) बायल्यावाणी कायले मरतं?
११) सरकार म्हंजे काय असते?
१२) 'लुच्चे दिन' आले
१३) लेकीसूना घेऊन नाचासाठी या
१४) नाच्याले नोट
१५)किती चाटणार भारतपुत्रा?
१६) नाकानं कांदे सोलतोस किती?
१७) धकव रं श्यामराव
१८) राख होऊन मेला
१९) आंब्याच्या झाडाले वांगे
२०) विदर्भाचा उन्हाळा
२१) बायको
२२) लकस-फकस
२३) झ्यामल-झ्यामल
२४) खाया उठली महागाई
२५) मेल्याशिवाय जात नाही
२६) दॅट्स व्हाय इंडिया महान है
२७) चापलूस चमचा

**कविता**

२८) नमनश्रमदेवाला...!
२९) नका घेऊ गळफास
३०) किसानो हो जावो तैय्यार
३१) माझी मराठी माऊली
३२) लोकशाहीचा अभंग
३३) लोकशाहीचा सांगावा
३४) गर्भपातल्या रानी ....!
३५) आयुष्यकडेवर घेतो
३६) तार मनाची दे झंकारून
३७) सावध व्हावे हे जनताजन
३८) घुंगराची धून
३९) प्रीतीची पारंबी
४०) पैसा येतो आणिक जातो
४१) पायाखालची वीट दे...!
४२) विठ्ठलाला पिणारा पाहिजे..!
४३) दगा जर दिला
४४) इन्सान की नियत
४५) आला आला चड्डीवाला
४६) सूर्य थकला आहे
४७) पाणी लाऊन हजामत
४८) एक होती मावशी
४९) सिक्वेंस....!
५०) मैत्र झुलवून बघ
५१) आयुष्याची दोरी
५२) दिवाळीच्या हार्दीक शुभेच्छा
५३) 'रावणदहनाच्या' हार्दिक शुभेच्छा..!
५४) शोकसंदेश
५५) तू चांदणन्हाली अप्सरा
५६) रंगताना रंगामध्ये
५७) निसर्गकन्या : लावणी
५८) गवसला एक पाहुणा : लावणी
५९) भ्रष्टाचाऱ्यास हाण पाठी : पोवाडा
६०) बालकविता

**गजल**

६१) वैश्विक खाज नाही
६२) पाहून घे महात्म्या
६३) कळली तर कळवा
६४) मढे मोजण्याला
६५) चुलीमध्ये घाल
६६) एक केवळ बाप तो
६७) नाटक वाटू नये

## हाण त्याच्या टाळक्यात

ऊठ मर्दा ऊठ, आवळून घे मूठ
हाण त्याच्या टाळक्यात, पायामधला बूट



सत्तेपुढे शहाणपण जेव्हा व्यर्थ जाते
माणुसकीचे लचके तोडून लाचखोर खाते
पौरुषाच्या नशेचे, तेव्हा लाव दोन घूट
अन्
हाण त्याच्या टाळक्यात, पायामधला बूट

अन्यायाची सीमा जेव्हा मर्यादेला लांघते
तुझे हक्क तुडवून तिरडीवर बांधते
शेपटी तेव्हा खाली नको,
वाघासारखा ऊठ
अन्
हाण त्याच्या टाळक्यात, पायामधला बूट

पोशिंद्याच्या छाताडावर हरामींच्या मौजा
तेव्हा राज्य करतात लुटारूंच्या फौजा
सत्ता आणि दलालांची, कर ताटातूट
अन्
हाण त्याच्या टाळक्यात, पायामधला बूट

माय तुझी बैलावाणी राबराबून मेली
गल्लीमध्ये मुळं अन् दिल्लीमध्ये वेली
'अभय'तेने शोध घे, कोणी केली लूट
अन्
हाण त्याच्या टाळक्यात, पायामधला

**(नागपुरी तडका)**

# स्वदेशीचे ढोंगधतूरे

एक आणखी झाडावरती लटकून मेला काल
तुझ्या कागदी नियोजनाला भोकामध्ये घाल

पुन्हा एकदा बिनपाण्याने भाजून गेले शेत
एसीमध्ये आखतोस तू सटरमफटरम बेत
तुला दावतो भकासबंजर तू बांधावरती चाल

खते, औषधी, बीज, मजुरी दसपट झाले भाव
वीज, किराणा, डिझेल, डॉक्टर लुटून नेती गाव
अन् तुला पाहिजे स्वस्तामध्ये शेतीमधला माल

शेतपिकाच्या निर्यातीला जगात आहे वाव
बरकत येऊ शकते हे तर तुलाही आहे ठाव
तरी खेळतोस तू शहाण्या का रे तिरपी चाल ?

आयातीवर सूट देऊनी गाडलास तू बळीराजा
म्हणून वाजतो दारापुढती अंत्यक्रियेचा वाजा
स्वदेशीचे ढोंगधतूरे; खातोस विदेशातली दाल

छल कपटाचा नाद सोडून भानावर ये आता
‘अभय’ जाहली जर भूमिकन्या, मरशील लाथा खाता
तुझी हुशारी, अक्कल तज्ज्ञा बेसुरी बेताल

**(नागपुरी तडका)**

# गोवंशाला अभय द्या

बाता नोको फफलू बापू, दुभतं करुन पाह्य
तवा तुले माहित पडंन, काह्यले म्हंते गाय...!!

शेणपुंजा, दूध-दोह्यनं, मनके कडकड करते
गोधन चारु चारु राज्या, मांड्या-पोटऱ्या भरते
तरीबी अमुच्या भगुण्याले, तुमचा देव पावत नाय...!!

फुक्कट चोखू, ढोंगी म्हणती, ''गाय आमुची माय''
सस्त्यामंधी दूध मागती अन फुकटामंधी साय
लेकरु माह्य उपाशी; अन थ्ये तुपाशी खाय...!!

गोभक्तांनो! विकत घ्याव्या, तुम्हीच भाकड गायी
कसाब देतो त्याच्या दसपट, करुनिया भरपाई
गोवंशाला 'अभय' द्यावया, ह्यो एकच इलाज हाय...!!

**(नागपुरी तडका)**

## बिपाशाले लुगडं

श्याम्यानं इचीबैन, कहरच केला
बिपाशासाठी मुंबईले, लुगडं घेऊन गेला...।।१।।

त्याले वाटलं मायबाप, भलते गरीब असन
म्हून तिले आंगभर, कपडे भेटत नसन
वाढलीहूढली पोरगी, तरणीबांड दिसते
इकडं झाकाले गेली, तं तिकडं उघडं पडते
म्हून त्यानं कपड्याचा, थैला भरून नेला...।।२।।

जुहूच्या चौपाटीवर, भेट त्यायची झाली
तिले पाहून शाम्याची, बंदी विकेट गेली
तिले म्हणजे चोळी घाल, घे लुगडं नेसून
थ्ये म्हणे आवमाय, हे भूत आलं कुठून?
मंग जुहूवर धमासान, तमाशा सुरू झाला...।।३।।

लय वळवलं तिचं मन, पण मन नाय वळे
मंग श्याम्या धावे मांगं, आनं थ्ये पुढे पळे
वन्समोअर, वन्समोअर, लोकं भाय बोंबले
कॅमेरेवाले पोझ घेऊन, कॅमेरे रोखून थांबले
पोलीसायनं बैनमाय, नावकूल विचका केला
आनं त्याच्या पुढचा एपीसोड, राहूनच गेला...।।४।।

..................................................

**ढोबळ मानाने शब्दार्थ :-**
**इचीबैन, बैनमाय** = च्यायला सारखे.
**वाढलीहूडली** = वयात आलेली. **बंदी** = पूर्ण, संपूर्ण.
**आवमाय** = अगबाई, **मांगं** = मागे, **नावकूल** = पुर्णपणे.

..................................................

(नागपुरी तडका)

## कुठे बुडाला चरखा?

राजकर्‍यांनो जनतेसाठी एवढे ध्यानी घ्यावे
तुमच्यामध्ये काय ‘वेगळे याचे उत्तर द्यावे...!!

अकबर होता, जुलूम होता, अन सुलतानी सत्ता
खुशालचेंडू मजेत होते, घामाची हालत खस्ता
काय निराळे आज भासते, तितुकेची सांगावे
तुमच्यामध्ये काय ‘वेगळे’ याचे उत्तर द्यावे...!!

इंग्रज होते, लुटत होते, येथील कच्च्या माला
पक्का करूनी, चौपट दामा, विकत ग्राहकाला
काय निराळे आज आढळे, तितुकेची बोलावे
तुमच्यामध्ये काय ‘वेगळे’ याचे उत्तर द्यावे...!!

रेल्वे आली, विमान आले, आले शाळा-रस्ते
कोर्ट-कचेर्‍या अन नोकर्‍या, त्याही गोर्‍या हस्ते
काय निराळे तुम्ही घडवले, तितुकेची हाकावे
तुमच्यामध्ये काय ‘वेगळे’ याचे उत्तर द्यावे...!!

टीव्ही आली, संगणक आले, आली कॉटन-बीटी
इलेक्ट्रॉनने झेप घेतली, तुमचे योगदान किती?
काय निराळे तुम्ही मढवले, तितुकेची सांगावे
तुमच्यामध्ये काय ‘वेगळे’ याचे उत्तर द्यावे...!!

काय झाले ग्रामोदयाचे? कुठे बुडाला चरखा?
स्वदेशी ते काय उरले, बघा काढुनी बुरखा
दिवे तुम्ही किती लावले, ‘अभय’तेने दावावे
तुमच्यामध्ये काय ‘वेगळे’ याचे उत्तर द्यावे...!!

**(नागपुरी तडका)**

# छातीचं झाकण बोम्लीवर आलं

छातीचं झाकण आता बोम्लीवर आलं
हात्तिच्या बैनमाय भलतंच झालं.....!!
चॅनल पाहावं कोणतंय तं उघडेबंब नाचते
टीव्ही पाह्यतांना पोरासंग, मायबाप लाजते
सभ्यतेची अभिरुची लईच दिसते न्यारी
अब्रू गेली ढोड्यात अन् नोट झाली प्यारी
आता उघडं काय, झाकलं काय, सारखंच झालं
हात्तिच्या बैनमाय भलतंच झालं.....!!
जलश्यातल्या पोरी कशा टगरबगर पाहे
चार लोकामंधी मात्र झाकूनझुकून राहे
जे काही करे ते अंधारात करे
उजेडात मात्र इज्जतीले मरे
आता उजेड काय, अंधार काय, सारखंच झालं
हात्तिच्या बैनमाय भलतंच झालं.....!!
कालेजचे तोतामैना वर्गात नाय दिसत
आडमार्गी झाडाखाली बसते दात किसत
जनाची लाज ना मनाले खंत
खुलेआम प्रेमलीला, नाही त्याले अंत
आता दिवस काय, रात्र काय, सारखंच झालं
हात्तिच्या बैनमाय भलतंच झालं.....!!
शायण्याने बगीच्यात जाऊ नये म्हणतात
बिनावाऱ्यानं झुडपं तिथं, खल-खल हालतात
झुडपाच्या आडोशाला दोन पाखरं बसते
''प्रेम'' या शब्दाचे धिंडवडे नुसते
आता भय काय, 'अभय' काय, सारखंच झालं
हात्तिच्या बैनमाय भलतंच झालं.....!!

**(नागपुरी तडका)**

# पलंग मोडून व्हता

कोण जाणे कोणासंग टाका भिडून व्हता...।
सपनातून जाग आली तं पलंग मोडून व्हता...।।

जवा पाय कसाबचे मुंबईमंधी पडले
''लालबत्ती'' वाले तमाम घरामंधी दडले
तवा म्हणान माहा पारा असा काही चढला
दोन ढूशे मारून त्याले तोंडबुचक्या पाडला
पायापोटी तवा कसाब माह्या पडत व्हता...।।
अन्
सपनातून जाग आली तं पलंग मोडून व्हता...।।

सुराज्याचं सपन जवा शिवाजीले पडलं
इचिबैन तवा मले जाम स्फूरण चढलं
मंग म्हणान माही तलवार अशी काही चालली
एका हिसक्यात सारी सेना धारातिर्थी पाडली
चुलीमागं औरंगजेब जीव लपवत व्हता...।।
अन्
सपनातून जाग आली तं पलंग मोडून व्हता...।।

रावणानं सीता चोरून लंकेमंधी नेली
तळपायीची आग माह्या मस्तकात गेली
तोडून त्याचे नऊ मुंडके, मी संग घेऊन आलो
पण; तवापासून मीच 'अभय' दहातोंड्या झालो
काय करू, काय नाही; मले समजत नाही आता
अन्
सपनातून जाग आली तं घाम फुटून व्हता...।।

**(नागपुरी तडका)**

## बोल बैला बोल

बोल बैला बोल तुला बोललंच पाह्यजे
बांधलेलं मुस्कं आता सोडलंच पाह्यजे...!

नांगर ओढू ओढू जेव्हा तोंड फेसाळंले
कोणी तरी आला का रे हाल पुसायाले?
ज्यांच्यासाठी पिकवलेस वखारभरून धान्य
आहेत का रे तरी त्यांना हक्क तुझे मान्य?
फुकामधी रक्त आटणं थांबलंच पाह्यजे...!

थंडी-पाऊस, ऊन-वारा छातीवरी पेलतोस
वादळाचे तडाखे शिंगावरी झेलतोस
तेव्हा कुठे हिरवीगार होते काळी आई
तरी का रे तुझे श्रम मातीमोल जाई?
लुटीचं अर्थकारण तू शिकलंच पाह्यजे...!

इच्छाधारी गायवासरे राजबिंडे नवी
खुर्चीसाठी त्यांना तुझी हाडंकुडं हवी
तुझे कष्ट त्यांचे लेखी भिक्षापात्रतेचे
ऐद्यांना देणार 'अभय' अन्न सुरक्षेचे
जागा हो बैलोबा तू जागलंच पाह्यजे...!

**(नागपुरी तडका)**

## धोतर फाटेपाव्तर

मारखुंड्याच्या घरामंधी पारखुंडा गेला
धोतर फाटेपाव्तर सोटे खाऊन आला...।।१।।

गाढवाम्होरं भगवद्‌गीता वाचून काय होते?
माणसाची अक्कल तरी भायच उतू जाते
राखडीमंदी लोळू नको, सांगासाठी गेला
उसण उतरेपाव्तर लाथा खाऊन आला...।।२।।

मुद्दे आटून गेले की, हातघाईवर येणार
शिवीगाळ करता करता, गुद्दे हाणून देणार
माणुसकीच्या गोष्टी त्याले समजवाले गेला
येता येता ढोरावाणी, रट्टे खाऊन आला ...।।३।।

पोशाखाच्या आधाराने, पारख होत नसते
कपड्याच्या आतमंदी, नंगे लपून बसते
मांडी उघडी दिसली म्हणून, झाकासाठी गेला
होती नव्हती थेय आपली, अब्रू देऊन आला ...।।४।।

अरधकच्चं ग्यान लई, खतरा असते भाऊ
नको 'अभय' कोणाच्याबी, झाशामंदी जाऊ
कावरल्या कुत्र्यासाठी भाकर घेऊन गेला
येता येता बोम्लीवर, सुया घेऊन आला ...।।५।।

-------------------------------------
मारखुंडा = मारकुडा, पारखुंडा = पारखी, पारख करणारा
-------------------------------------

**(नागपुरी तडका)**

## बायल्यावाणी कायले मरतं?

बायल्यावाणी कायले मरतं? मर्दावाणी मरं।
सरणावरून उठ... अनं... मशाल हाती धर ...!!

तुह्यावाणी लाखो मेले... काही फरक पडला?
येथे सारे निगरगट्ट... काही बदल घडला?
त्यायच्यावाणी तू बी... फुक्कट जाशीन मरून
संसाराची धूळधान... व्हईन आणखी वरून
लढल्याबिगर मोक्ष नाय... कृष्णवचन स्मर...!!

कर्जपाणी, घेणंदेणं... आता चिंता सोड
आला दिवस तसा... मानून घे तू गोड
कुणी आला 'यम' दारी... शब्द त्याचे छाट
''पिकलं तवा लुटलं''... झालं फिट्टमफाट
धमन्यामंधी बारुद भर... आनं... आवाज मोठा कर...!!

जेव्हा पाय चालणारा... रस्ता जातो खुटून
श्वासाभरल्या विचारांचा... धागा जातो तुटून
तेव्हा तरी निग्रहाने... विवेकाला स्मर
ज्यांनी केली दुर्गती... त्यांची यादी कर
एकटा नको मरू... संग... दहा घेऊन मर...!!

कायदा तुह्या विरोधात... 'अभय' नाही तुले
म्हूनशान लढले भाऊ... शरद जोशी - फुले
तुह्यी हाक घेण्यासाठी... सरकार मूकं-बह्यरं
आपण सारे मिळून लढू... करू त्याले सह्यरं
लुटारुंचे रचू थर... आनं... नाचू गच्चीवर...!!

**(नागपुरी तडका)**

## सरकार म्हंजे काय असते?

गरिबावरती गरजते, धनिकावरी बरसते
एक सांगा भाऊसाहेब
सरकार म्हंजे यापेक्षा वेगळं काय असते?

हिरवं गेलं, निळसर गेलं, भगवं आलं
अस्काऱ्याच्या म्हशीले टोणगं झालं
टोणग्याच्या पाठीवर मलमली झूल
म्हशीच्या वेणीले धोतऱ्याचं फूल
साल बदललं तरीबी हाल बदलत नसते?

सातव्या आयोगाचा तिजोरीवर डल्ला
सामूहिक लग्नाचा शेतकऱ्याले सल्ला
अकलेचे कांदे बदबद पिकले
नाकाचे नकटे प्रवचन शिकले
समज ना उमज पण खुर्चीत धसते?

जुन्या काळचे डाकू तरी लै बेस व्हते
शेतावरच्या श्रमिकांना कधी लुटत नोयते
शोषकांच्या छाताडावर पुरणपोळी लाटे
तीर्थप्रसाद करुनशान भुकेल्यांना वाटे
शेतीच्या गच्चीवर आता सरकारच बसते?

उठसूठ होयनोय पाखुरा करते
'मुक्या'च्या चुलीपाशी झाडलोट करते
गावातला 'मुका' इथं फास घेऊन मरते
पोशिंद्याच्या मढ्यावर बांडगूळ चरते
'अभय'तेच्या मस्तीवर ऐदी फुसफुसते?

**(नागपुरी तडका)**

## ‘लुच्चे दिन’ आले

‘सच्चे दिन’ म्हणता म्हणता ‘लुच्चे दिन’ आले
अनं शेतमालाचे भाव तमाम लंबेलाट झाले...।।

म्हण काही श्यामराव, पण सत्य एकच हाय
शेतकऱ्यांच्या नात्यामंधी कोणताच पक्ष नाय
सत्तेमधी गेल्याबरोबर माजावरती येते
पण शेतकऱ्यांच्या नावाचं कुंकू पुसून घेते
मतं मागासाठी सारे सोंगी-ढोंगी झाले...।।

ओला पडो, सुका पडो, सारं थ्येच असते
पंजा येवो, फूल येवो, कोणी आपलं नसते
यंदाच्या बाजारात पुरी मंदी आली
शेतकऱ्यांना स्मशानात थेट घेऊन गेली
कुणास पडलं सुतूक, जरी बदाबदा मेले?...।।

दुष्काळाच्या वाऱ्यापायी शेंगा नाही झोंबल्या
ज्या काही झोंबल्या त्या भावापायी लोंबल्या
चाळीस रुपये किलोवर कापूस रांगत नाही
सोयाबिनच्या इज्जतीले व्यापार हुंगत नाही
काय करू काय नाही, समजत नाही मले...।।

कास्तकाराचे हाल भाऊ, कुत्रे पुसत नाही
काय पेरावं यंदा, काही मार्ग सुचत नाही
ना सुलतानाची हमी, ना कायदोबाचे ‘अभय’
म्हणत असतो तरी आम्ही, ‘‘भारतमाता की जय’’
आमच्यात एकी नाई म्हून, इथं डाकू पैदा झाले...।।

**(नागपुरी तडका)**

## लेकीसूना घेऊन नाचासाठी या

खाली करा शेतशिवार, इथून चालते व्हा
कुठं जाऊ पुसू नका, ढोड्यामंधी जा ...।।

शूद्र तुम्ही शेतकरी, ध्यानी धरा पक्के
सरकाराचे बाप आम्ही, चार पानी एक्के
वाद फालतू घालू नका, उगाच काहीबाही
कोर्टामधी जाण्याची, तुम्हांस मुभा नाही
कायदा कडक वाटतो? तर तेल माखून घ्या ...।।

घटनेमधले परिशिष्ट, नऊ वाचून पहा
शेतकऱ्यांनो तुम्ही तुमच्या, औकातीत राहा
मर्जीनुसार हिसकून घेऊ, तुमचा जमीनजुमला
कायद्यानंच बांधू तिथं, फाइव्ह स्टार बंगला
तुमच्या लेकीसूना घेऊन, नाचासाठी या ...।।

इलंक्शनच्या टायमाले, थैल्या ढिल्या करतो
नाक लाजिम करण्यासाठी, चिमटीमध्ये धरतो
तवा कुठं भूमीग्रहण, कायदा येत असते
पैशाबिगर कोणालेच, 'अभय' मिळत नसते
उचला आता धोपटी-बिऱ्हाड, अनं चालते व्हा ...।।

**(नागपुरी तडका)**

## नाच्याले नोट

चमचमी बूट हाय, मलमली कोट हाय
सिगारेट सिलगवाले, हजारची नोट हाय

तुटलेली चप्पल, चड्डीले भोक हाय
बापाच्या नशीबात, जह्यराचा घोट हाय

मरणारे मरतात, चरणारे चरतात
लेका इथं कोणाच्या, हाडावर चोट हाय?

वाणी-दास-पुढाऱ्याच्या, मिशीले तूप हाय
अन् देशाच्या मालकाचेच, पाठीले पोट हाय

जसं तुले हाय तसं, मलेबी वोट हाय
ढ्यँगपाट्या सरकारच्या बापामधे खोट हाय

सात, आठ, नवव्या आयोगाचे योग हाय
कापसाले भाव म्हणान तं फेंडीवर सोट हाय

मुद्रास्फितीच्या व्यवस्थेत सृजकाचे हाल हाय
अनितिले 'अभय' आणि नाच्याले नोट हाय

**(नागपुरी तडका)**

## किती चाटणार भारतपुत्रा?

कृष्णावाणी राहुल आणि, म्हणे सोनिया भारतमाय
किती चाटणे आणखी रे, भारतपुत्रा असेच पाय? ...!!

जन्म गेला पूर्वजांचा, करता करता खुशामतगिरी
गुलाम तेही मिरवत होते, चप्पल घेऊन डोक्यावरी
दास्यत्वाची जनुकं अजुनी, काही केल्या मरत नाही
आनुवंशिकतेची देण अशी की, लाळघोटणे सरत नाही
चापलुशीम्होरं आता, कसले संस्कार, कसलं काय ...!!

राजेशाहीची भलावण, रक्तामासात भिनलेली
भाटगिरीच करता करता, बुद्धी सारी झिंगलेली
कणा आणि मणकाही, उत्क्रांतीमध्ये गळून गेला
स्वाभिमान नावाचा इसम, शरमेसंगे पळून गेला
लोकशाहीचे गुणधर्म रक्तात काही मिसळत नाय ...!!

शंभर कोटी जनतेमध्ये, राष्ट्रनायक दिसत नाही
'ते' घराणे सोडून अन्य, कुणीच लायक भासत नाही
असेच आमचे गणराज्य, अशीच आमची लोकशाही
भगत-बापूंना माहीत नव्हते, अर्थ निघणार असाही
मुजोर सारे 'अभय' झाले, खाण्याकरिता मलईसाय ...!!

---

इसम = व्यक्ती

**(नागपुरी तडका)**

## नाकानं कांदे सोलतोस किती?

तुझा अभ्यास किती, तू बोलतोस किती
नाकानं कांदे सोलतोस किती?

तुझी नशा किती, तू डोलतोस किती
नाकानं डांगरं तोलतोस किती?

तुझा व्यायाम किती, तू पेलतोस किती
नाकावर भेद्रं झेलतोस किती?

तुझी मेहनत किती, तू राखतोस किती
नाकानं टेंभरं चाखतोस किती?

तुझे योगदान किती, तू लाटतोस किती
नाकानं गाजरं वाटतोस किती?

तुझी सत्ता किती, तू येलतोस किती
नाकानं आलू छिलतोस किती?

तुझी भूक किती, तू गिळतोस किती
'अभय'तेनं जनता पिळतोस किती?

..................................................

ढोबळमानाने शब्दार्थ-
डांगरं = खरबुज. - भेद्रं = टमाटर, टोमॅटो - टेंभरं = टेंभुर्णीचे फळ.
येलणे = वेल्हाळणे. - राखणे = रखवाली करणे या अर्थाने.

..................................................

(नागपुरी तडका)

## धकव रं श्यामराव

धकव रं श्यामराव झोल नको खाऊ
नशिबाची गाथा नको कोणापाशी गाऊ ...!

रगताचं पाणी करून रान शिंपलं बावा
गारपिटीनं कहर केला निसर्गानं कावा
कंबरछाती गहू होता पुरा झोपून गेला
उंबईचा फुलोरा खड्डून झाडून नेला
दोघाचंबी गऱ्हाणं सारखंच हाय भाऊ ...!

मार्केटात गेलो तर उलटे झाले गिऱ्हे
खरीददार म्हणे ह्यो गहू होय का जिरे?
आजकाल म्हणजे याले कोंबडी खात नाही
घेऊन जा वापस नायतर धडगत नाही
नशीब धुवासाठी मी कोणत्या गंगेत न्हाऊ? ...!

पदवीची पुंगी घेऊन पोरगं वणवण फिरते
डोनेशनबिगर कुठं नोकरीपाणी मिळते?
चपराश्याचा भाव सध्या सात लाख सांगते
मास्तरसाठी 'अभय'तेनं बारा लाख मांगते
''नोकरीले मार गोली'' म्हणलं खेतीवाडीच पाहू ...!

..............................................

ढोबळमानाने शब्दार्थ–
झोल खाणे = कच खाणे, माघार घेणे.
उंबई = ओंबी, गिऱ्हे = ग्रह

..............................................

(नागपुरी तडका)

## राख होऊन मेला

हप्ता थकला म्हूनशान, वसुलीले गेला
हप्ता गेला भाडमंधी, राख होऊन मेला ...।।१।।
पंचीस पेट्या महिनेवारी, सेटींग जमून व्हते
तारखेवार भेटेस्तोवर, काईबी प्राब्लेम नोते
कायच्यातबी काईबी मिसळा, देल्ली व्हती हमी
साधेसिधे समिकरन; अर्धे तुमी, अर्धे आमी
हप्त्यापायी जीव जाईन, माहित नोयतं त्येला ...।।२।।
महिना उलटून गेला बैन, हप्ता नाई आला
मंग जीव सायबाचा, कालवाकालव झाला
सायेब म्हने श्याम्या तुह्या, मनात बद्दी आली?
हप्ता नाय तं धंदा नाय, कायढीन तुह्या साली
हप्त्यासाठी सांग तुनं, उशीर काहून केला? ...।।३।।
श्याम्या म्हणे उशिर कारन, मेली माही बायकू
सायेब म्हने, तुह्या बाह्यना, मी कायले आयकू?
माय मरन, पोट्टं मरन, उद्या मरन तुहा भाऊ
आमी किती दिवस मंग असे, हप्त्याबिना राहू?
एकटा मीच खात नाय, वर्तून आडर आला ...।।४।।
''पोट्टं मरन'' म्हनल्यावर, झकापकी झाली
तळपायाची आग मंग, मस्तकात गेली
गुंडा नोयता तरीबी पन, गुंड्यावानी वागला
अध्धर उचलून सायबाले, भट्टीमंधी फेकला
कोनी 'अभय' ह्यो देस, भलतीकडं नेला?
हप्ता गेला भाडमंधी, भट्टीमंधी मेला ...।।५।।

...........................................................

भाड = भट्टी, लोहाराचा भाता
पेट्या = दोन नंबरच्या आर्थिक व्यवहारात पेटी म्हणजे लक्ष व खोका म्हणजे कोटी
बाह्यना = बहाणा, खोटी सबब, अध्धर = हवेत अधांतरी

**(नागपुरी तडका)**

## आंब्याच्या झाडाले वांगे

माणसावाणी नीती सोडून वृक्ष वागत नाही
म्हणून आंब्याच्या झाडाले वांगे लागत नाही ...!

अवर्षण येवो किंवा सोसाट्याचे वादळ
बहर आणि मोहर कधी त्याचे थांबत नाही ...!

पाने देतो, फळे देतो आणि देतो छाया
बदल्यामधी घूटभर पाणी मागत नाही ...!

कोकीळ येवो, माकड येवो किंवा येवो घुबड
फांदीवरती बसू देतो, भेद मानत नाही ...!

मकानाले लाकूड देतो, सयपाकाले सरपण
कुऱ्हाडीले दांडा देतो, वैरी जाणत नाही ...!

सद्‌गुणाचे सामर्थ्य 'अभय' त्याले कळे
जरी ग्रंथ, पुराणे वा पुस्तक वाचत नाही ...!

..................................................

**(नागपुरी तडका)**

## विदर्भाचा उन्हाळा

औंदाच्या उन्हाळ्यानं, धमालच केली
आनं श्याम्याची दाढीमिशी, भाजूनच गेली ...।।१।।

हे ऊन व्हंय का, कां व्हंय, काही समजत नाही
पाण्यासाठी जीव कसा, करतो लाही-लाही
पन्नास डिग्रीच्याह्यवर, पारा चढून गेला
पाणी पेऊ-पेऊ जीव, आदमुसा झाला
इच्चीबैन ओठ-जीभ, सोकूनच गेली ...।।२।।

बाहेर निघतो म्हणलं तं, जम्मून झावा चालते
घरामंधी घुसावं तं, उकाडा फोडणी घालते
लोडशेडिंग पायी बाप्पा, नाकात नव आले
कूलर-पंखे गर्मी पाहून, कामचुकार झाले
उष्माघात आकडेवारी, वाढूनच गेली ...।।३।।

नदी-नाले कोरडे कारण, बरसात नाही झोंबली
पाणी कमी हाय म्हून, वीजनिर्मिती थांबली
नळामधून पाणी कमी, हवा शिट्ट्या मारते
विहीर-तलाव ठणठण, पाणी आंग चोरते
दुष्काळाची बहीणमाय, माजूनच गेली ...।।४।।

पशू-पक्षी 'अभय' नाही, निवारा ना थारा
मागून-पुढून मस्त देते, चटके गरम वारा
दैवाचे फटके सोसून, माऊल्या झाल्या धीट
घागरभर पाण्यासाठी, अर्धा कोस पायपीट
नशिबाले जगरूढी, चिपकूनच गेली ...।।५।।

.................................................

ढोबळमानाने शब्दार्थ-
जम्मून = जोराने, झपाट्याने. - झावा = गरम हवेचे तडाखे.

.................................................

**(नागपुरी तडका)**

## बायको

थोडीशी पगली, थोडीशी सायको
देवानं देल्ली बावा, अशी कशी बायको ....।।१।।

सलवार घाल म्हनलं तं नववारी घालते
कपाळाच्या मंधामंधी गोल कुंकू लावते
टिकल्या-मिकल्या लावाच्या फंदात पडत नाही
गळ्यामंधी गुंजीभर सोनं मिरवत नाही
थोडीशी येडपट, थोडीशी सायको
देवानं देल्ली बावा, अशी कशी बायको ....।।२।।

सिनेमा पाहू म्हनलं तं भागवतात जाते
माह्यासाठी मुठभर शिरनी घेऊन येते
मास-मच्छी-अंडीले हात लावत नाही
तरी बाप्पा तीले काही देव पावत नाही
थोडीशी भोळसट, थोडीशी सायको
देवानं देल्ली बावा, अशी कशी बायको ....।।३।।

साऱ्यायले खाऊ घालून, उरलंसुरलं खाते
कवाकवा पानी पेऊन तशीच झोपी जाते
सडासारवन, धूनंपानी, 'अभय' सारं करते
पहाटपासून रातपावतर मरमर मरते
थोडीशी कष्टीक, थोडीशी सायको
देवानं देल्ली बावा, अशी कशी बायको ....।।४।।

-----------------------------------
शीरनी = प्रसाद, सायको = Psycho
-----------------------------------

(नागपुरी तडका)

## लकस-फकस

काहून बाप्पा रंगराव, लकस-फकस चालता
खादीचं धोतर सोडून, मांजरपाठ घालता ....!!

'सहकारात' होते तेव्हा, काय तोरा व्हता
कौलारू खोपडं पाडून, इमले बांधत व्हता
कशी कमाई होते बाप्पा, भगवंताची माया
देवधरम सोडून जनता, पडे तुमच्या पाया
पद गेल्याच्यानं आता, गोमाश्या हाकलता ....!!

म्हणा काही रंगराव, गणित तुमचं चुकलं
विरोधात बसले म्हून, खिसे भरणं हुकलं
बाकीच्यायनं थातुरमातुर, टोपीपालट केली
दोन पिढ्या बघा कशी, गरिबी हटून गेली
पब्लिकच्या भावनेसंगं, चेंडूवाणी खेलता ....!!

होयनोय उठसूठ, विमानवाऱ्या करता
खुर्चीच्या लोभापायी, दिल्लीत पाणी भरता
जनतेचे प्रश्न जरा, 'अभय'तेनं मांडा
मणका टाईट ठेवूनशान, खमठोकपणे भांडा
हायकमांडच्या गुरकावणीले थरथर हालता ....!!

..................................................

ढोबळमानाने शब्दार्थ-
लकस-फकस = बेडौल
मांजरपाठ = स्वस्त व जाड धोतर

..................................................

**(नागपुरी तडका)**

## झ्यामल-झ्यामल

कायरं श्यामा इथंतिथं झ्यामल-झ्यामल करतोस
बैन तोंडाले खरूज आनं मोंढ्याले खाजवतोस....!!

ईचीबैन हे गजकरण भलतच भारी असते
चहाड्या-चुगल्या केल्याबिना पोट भरत नसते
अफवा पेरासाठी लोकायचे कानफट पाजवतोस
बैन तोंडाले खरूज आनं मोंढ्याले खाजवतोस....!!

याची टोपी त्याच डोस्कं, काट्याने काटा काढतोस
साथ देईन त्यालेच तू, तोंडबुचक्या पाडतोस
सिध्यासाध्या असामीले, बोटावर नाचवतोस
बैन तोंडाले खरूज आनं मोंढ्याले खाजवतोस....!!

समोरच्या तंगडीमध्ये, आडवी तंगडी घालतोस
त्याले उबडं पाडूनशान, त्याच्या म्होरं चालतोस
समद्यायले झाशा देऊन, 'अभय' भाकरी भाजतोस
बैन तोंडाले खरूज आनं मोंढ्याले खाजवतोस....!!

..................................................
मोंढा =पाठीचा खांद्यालगतचा भाग.
..................................................

**(नागपुरी तडका)**

## खाया उठली महागाई

नाकी तोंडी पाणी घुसले, जीव झकोले खाई
वेसण तुटली, स्वैर सुटली, खाया उठली महागाई ....!!
आवतन नव्हते दिले तरी, वाजत-गाजत आली
एक तारखेस खिसा भरला, पाच तारखेस खाली
देवदर्शन दुर्लभ झाले, आता पायी पंढरवारी
गहाळ झाल्या सोयी-सुविधा, परी कर वाढतो भारी
धान्यामधी खडे मिसळती, शासक टुकटुक पाही
वेसण तुटली, स्वैर सुटली, खाया उठली महागाई ....!!
तेलामध्ये भेसळ होते, मिरची मध्ये गेरू
पाचक रसा दुर्बल करते, व्याधी पाहते घेरू
दवादारू महाग झाली, आतून काळीज पिरडी
गरिबाघरी कॅंसर आला, बांधून ठेवा तिरडी
मुक्ती मागे रोगी सत्वर, अन यमास नसते घाई
वेसण तुटली, स्वैर सुटली, खाया उठली महागाई ....!!
नाही आवर महागाईला, मग कशास शासनकर्ते?
इच्छाशक्ती मरून जाता, औचित्य काय ते उरते?
लाल दिव्याचा हव्यास केवळ, केवळ सत्तापिपासा
घाऊकतेने भरडून खाती, हीन-दीनांच्या आशा
आमजनांना 'अभय'दाता, 'विचार' उरला नाही
वेसण तुटली, स्वैर सुटली, खाया उठली महागाई ....!!

.................................................

ढोबळमानाने शब्दार्थ-
झकोले = हेलकावे, आवतन = आमंत्रण : पिरडी = पिरडणे, पिरगाळणे

.................................................

(नागपुरी तडका)

## मेल्याशिवाय जात नाही

माझा बाप....
रामप्रहरी उठायचा, शेणपुंजा करायचा
नांगर घेऊन खांद्यावर, दम टाकीत चालायचा
गार गार थंडीतही, घामामध्ये भिजायचा

माझा बाप....
गायी-म्हशी चारायचा, दूधदुभते करायचा
भूमातेच्या कुशीमध्ये, मरेस्तोवर राबायचा
कांदा-मिरची-भाकर खाऊन
आला दिवस ढकलायचा....

माझा बाप....
आजारी पडला तरी, घरामध्येच कण्हायचा
औषधाला पैसा-अधला, कुठून आणू म्हणायचा
देव तरी पावेल म्हणून, पूजा अर्चा करायचा....

खडकू काही आले नाही
दवापाणी झाले नाही
गरिबीच्या सत्तेपुढं
डोकं काही चाले नाही
अंती मात्र देवच आला
प्राणज्योती घेऊन गेला....

नियोजनपंडितांना भयावह क्षय आहे
पोशिंदा भयभीत; ऐद्यांना 'अभय' आहे
शेतीमधल्या दुर्दशेचे कुत्रे हाल खात नाही!
शेतीमधली गरिबी मेल्याशिवाय जात नाही?

**(नागपुरी तडका)**

## दॅट्स व्हाय इंडिया महान है

इकडे अमुच्या भारताचा सातबारा गहाण है।
दॅट्स व्हाय शायनिंग यह इंडिया महान है।।

पोशिंद्याच्या घामाभवती बांडगुळांचे कडे
नितनेमाने रोज पाडती प्रेत-मढ्यांचे सडे
महासत्तेचे स्वप्न दावुनी तज्ज्ञ धावती पुढे
तिकडे त्रेपन-चौपन मजले मजल्यावरती चढे
चेले-चमचे, खुर्ची-एजंट गातसे गुणगान है।।

क्षुल्लक संख्या 'नरबळी'ची, अन् तांडव केवढे यांचे
शतसहस्र ''बळी'' बळीचे, पण हाल पुसेना त्यांचे
या शहाण्यांच्या सद्‌बुद्धीवर, अवदसा कुठूनी आली?
मुळी कशाची लाज न उरली; की बुद्धी भ्रमिष्ट झाली?
पगार-वेतन विनाश्रमाचे यांना करतसे नादान है?।।

या देशाच्या पुढारकांचा दिमाग सटकला आहे!
दीडदमडीच्या सुधारकांचा विवेक भटकला आहे!!
एकच प्रश्न अंतिम आता, पुसून घेऊ पुन्हा
विद्वानांनो, सुशिक्षितांनो, अरे! काय बिमारी तुम्हा?
काय नेमका इलाज तुम्हावर? आयुर्वेद की ॲलो?
धागे-दोरे की मांत्रिक-बाबा? बस एकबार तो बोलो!
जेणेकरूनी विवेक तुमचा येईल ताळ्यावरती
'अभय'तेने जगेल जनता त्यांच्या शेतावरती
आम्हालाबी जगू द्या आता! हम भी तो इन्सान है!!

**(नागपुरी तडका)**

## चापलूस चमचा

हलक्या-पतल्याचा जमाना, राह्यलाच नाही
श्याम्यासारखा इब्लिस, म्या पाह्यलाच नाही ....!!

पोम्याले म्हणे तुनं, शरम काहून विकली
मिशी पकून गेली तरी, अक्कल नाही पिकली
मुकरदमच्या चपला चक्क, डोस्क्यावर घेते
एवढा कसा लाचार होऊन, त्यायचे धोतरं धुते
असा चापलूस चमचा म्हणे, झालाच नाही ....!!

चारचौघात गेला तं अक्कल तारे तोडते
शोकसभेत बोलंण तं, जम्मून भाषण झोडते
असे गुण गावते, जे मयतात असन-नसन
याचं भाषण आयकून, थो मुर्दा हासत असण
देवळामंधी हार कधी, वाह्यलाच नाही ....!!

थेटरमंधी जाईन तं, सुदा नाय बसणार
'अभय'तेनं खुर्ची भेदून, याची तंगडी घुसणार
तमाशातल्या बाईवर, नोटा-बंडल लुटते
दमडीसाठी भिकाऱ्याले, अक्कल सांगत सुटते
जिंदगीचा डाव मात्र, हारलाच नाही ....!!

(नागपुरी तडका)

# आणि काही कविता.....

## नमन श्रमदेवाला...!

अविरत अवनीवर जो घाम गळवतो
त्या देवाला मी नमन करितो
त्या देवीला मी नमन करितो
श्रमदेवीला मी नमन करितो
श्रमदेवाला मी नमन करितो
जो अवनीवरती घाम गळवतो।।

खांदी नांगर हाती न्याहारी
मनपटलावर स्वप्नं रूपेरी
नाही कंदील, नाही विजेरी
भल्या पहाटे निघते स्वारी
नितदिन अवनीस जो घास भरवतो
त्या देवाला मी नमन करितो।।

बाळ चिमुकले पाठीवरती
सरपण मोळी डोईवरती
पदर खोचून कमरेभवती
गायवासरू हाकत पुढती
घागर-विळा खांदे सजवतो
त्या देवीला मी नमन करितो।।

मांजरझाकट वा रामप्रहरी
पाऊस, थंडी, उन्हं दुपारी
वेळी-अवेळी जित्रूप चारी
जागलखोपा सजवी शिवारी
'अभय' अविचल जो अन्न पिकवतो
त्या देवाला मी नमन करितो।।

**(कविता)**

## माझी मराठी माऊली

माझी मराठी माऊली, जसा ओंकाराचा वाण
शब्दशब्द मोहविते, हरपते देहभान ....।।१।।

माझी मराठी माऊली, शब्दामध्ये सरस्वती
ओव्या, श्लोक वाचुनिया, सारे जन सुज्ञ होती ....।।२।।

माझी मराठी माऊली, जसा गंगेचा प्रवाह
ओघवते उच्चारण, मन बोले वाह! वाह!! ....।।३।।

माझी मराठी माऊली, कोकिळेची कुहूकुहू
जशी पहाटेची साद, येते कानी मऊमऊ ....।।४।।

माझी मराठी माऊली, इंद्रधनुष्याचे रंग
आणि सुवासाने होई, चंपा, जाईजुई दंग ....।।५।।

माझी 'अभय' मराठी, रेशमाची नरमाई
दिसे माऊली शोभून, साऱ्या जगताची आई ....।।६।।

**(कविता)**

## लोकशाहीचा अभंग

आपुलिया हिता। असे जो जागता।
फक्त त्याची माता। लोकशाही।।

कष्टकरी जणू। सवतीचे पुत्र।
वटारते नेत्र। लोकशाही।।

पुढारी-पगारी। लाडके जावई।
माफियांची ताई। लोकशाही।।

संघटन, एकी। मेळ नाही ज्यांचे।
ऐकेचना त्यांचे। लोकशाही।।

मिळवुनी माया। जमिविती धाक।
त्यांची घेते हाक। लोकशाही।।

वापरता तंत्र। दबाव गटाचे।
तालावरी नाचे। लोकशाही।।

सत्तापिपासूंच्या। द्वारी मटकते।
रस्ता भटकते। लोकशाही।

चार पिढ्या सत्ता। एका कुटुंबाला।।
म्हणू कशी हिला। लोकशाही?।।

जनता 'अभय'। निर्भयाने व्हावी।
ताळ्यावर यावी। लोकशाही।।

**(कविता)**

# लोकशाहीचा सांगावा

आली भूमाता घेऊन। लोकशाहीचा सांगावा।
पाचावर्षाच्या बोलीन। गडी-चाकर नेमावा।।

लोकप्रतिनिधी नको। म्हणा लोकांचे नोकर।
जनतेच्या मतावर। यांची शिजते भाकर।।

होऊ नका लोभापायी। कोण्या पालखीचे भोई।
करा फक्त तेच ज्याने। सुखावेल काळीआई।।

धन-द्रव्य घेतल्याने। होते कर्तव्य गहाण।
नको स्वत्वाचा व्यापार। राखा आत्म्याचा सन्मान।।

नशापाणी फुकटाची। आणि खानावळी शाही।
होते अशा करणीने। कलंकित लोकशाही।।

धर्म-पंथ-जाती-पाती। यांना देऊ नये थारा।
मतदान करताना। फक्त विवेकाला स्मरा।।

पाच वर्ष जनतेची। करू शकेल का सेवा।
पात्रता नी योग्यतेचा। नीट अदमास घ्यावा।।

कुणी आला शुभ्रधारी। ढग पांघरुनी नवा।
आत कलंक नाही ना। गतकाळ आठवावा।।

कधी गाळला का घाम। त्याने मातीत राबून।
स्वावलंबी की हरामी। थोडे घ्यावे विचारून।।

पूर्ती केलेली नसेल। पूर्वी दिल्या वचनांची।
द्यावे हाकलुनी त्यास। वाट दावा बाहेरची।।

नको मिथ्या आश्वासने। बोला गंभीर म्हणावं।
कशी संपेल गरिबी। याचं उत्तर मागावं।।

कृषिप्रधान देशात। नाही शेतीचे ङ्गधोरणफ।
कच्च्या मालाच्या लुटीने। होते शेतीचे मरण।।

शेती रक्षणाकरिता। नाही एकही कायदा।
फुलतात घामावरी। ऐदी-बांडगुळे सदा।।

नको मिथ्या आश्वासने। बोला गंभीर म्हणावं।
कशी संपेल गरिबी। याचं उत्तर मागावं।।

कृषिप्रधान देशात। नाही शेतीचे ङ्गधोरणफ।
कच्च्या मालाच्या लुटीने। होते शेतीचे मरण।।

शेती रक्षणाकरिता। नाही एकही कायदा।
फुलतात घामावरी। ऐदी-बांडगुळे सदा।।

शेतीमध्ये जातो जो जो। मातीमोल होतो तो तो।
अशी अनीतीची नीती। कोण धोरणे आखतो?।।

सत्ता लोभापायी होतो। हायकमांडचा नंदी।
प्रश्न शेतीचे मांडेना। करा त्यास गावबंदी।।

पाचावर्षातुनी येते। संधी एकदा चालुनी।
करा मताचा वापर। अस्त्र-शस्त्र समजुनी।।

स्थिर मनाला करून। **अभय** व्हा निग्रहाने।
मग नोंदवावे मत। सारासार निश्चयाने।।

**(कविता)**

## गर्भपातल्या रानी ....!

गारपीटीच्या अंगसंगाने
गर्भपातल्या रानी
अश्रू होऊन हवेत विरले
पाटामधले पाणी

एका एका झाडावरती
पक्षी हजारो होते
क्षणात पडले सड्याप्रमाणे
सरली सारी कहाणी

हातामधला हात सुटूनी
घरटे विच्छिन्न झाले
बुंध्याभवती जमीन नहाली
रक्ताळल्या पिलांनी

ऊस झोपला, कापूस निजला
खुरटून गेल्या बागा
जगण्या-मरण्यामधले अंतर
उरले नसल्यावाणी

शाबूत उरल्या धान्यवखारी
बंगले, महालमाड्या
अन्नदात्याचे 'अभय' गेले
गेले दाणापाणी

**(कविता)**

## आयुष्य कडेवर घेतो

झुंजूमुंजू पहाटेला, आभा चढे आभाळाला
काळोखाच्या भेगातुनी, सूर्य डोकावतो
गारठल्या पंखामधी, आशा जागवतो

सुन्यासुन्या शिवाराला, निजलेल्या आवाजाला
चेव येण्याला कोंबडा, दारी बांग देतो
सुस्तावल्या आळसाला दूर पांगवतो

अन्नासाठी चिलंपीलं, खोप्यामधी किलबिल
लेकराची साद येता, पान्हा जन्म घेतो
चोचीमधी ममतेला, चिंब भिजवतो

'अभय'ता पेरताना, रुजलेली फुलताना
फळलेली पाहताना, जेव्हा आनंदतो
तेव्हा मीच माझ्या आयुष्याला, कडेवरी घेतो

(कविता)

## तार मनाची दे झंकारून

सूर शब्दांचे अलगत छेडून
तार मनाची दे झंकारून ....!!

भावबंध हे मनगर्भिचे
उधळण करतील चितरंगाचे
सुप्तभाव ते पुलकित होता
हात मोकळे तू द्यावे सोडून ....!!

मेघ गर्जुनी करतील दाटी
सुसाट वारा रेटारेटी
मनी विजाही करता लखलख
थेंब टपोरे तू जावे वर्षून ....!!

मनफुलांनी गंधीत वारा
दे दरवळूनी भावफुलोरा
बोल 'अभय' जे कानी येईल
तन्मयतेने घ्यावे ऐकून ....!!

(कविता)

## सावध व्हावे हे जनताजन

मळभटं सारी द्यावी झटकून
सावध व्हावे हे जनताजन ....।।१।।

कुणी फुकाने लाटती पापड
कुणी झोपला ओढुनी झापड
मुखा कुणी तो कुलूप ठोकुनी
चिडीचिप झाला मूग गिळून ....।।२।।

आग लागुनी जळता तरूवर
म्हणती आहे मम घर दूरवर
सोकाविती मग कोल्हे-लांडगे
आणि पिती रक्त पिळून ....।।३।।

किमान थोडा लगाम खेचा
नांगी धरूनी त्यांची ठेवा
झोपेचे हे सोंग फेकूनी
'अभय' पहा तू डोळे उघडून ....।।४।।

**(कविता)**

## घुंगराची धून

पहाटेचा शुक्रतारा। आला सनई घेऊन।
विनवितो जित्रूपाला। द्यावी घुंगराची धून।।

तुझ्या घुंगराचा नाद। म्हणे नादवतो मला।
असा सूरमयी सुर। सर नाही सनईला।।

तुझ्या कष्टाची कहानी। कधी घुंगरू सांगते।
तुझ्या वेदनांची गाथा। माझ्या हृदयी गोंदते।।

सारे जग झोपलेले। मीच एकटा जागतो।
फक्त साथ घुंगराचा। माझ्या जीवाला वाटतो।।

पहाटेच्या प्रहराला। लय घुमते निराळी।
जागविण्याला सुर्याला। जणू ऐकवी भुपाळी।।

**(कविता)**

## प्रीतीची पारंबी

रामाच्या प्रहराला केळीला जाग येते
पाडाच्या घडातुनी कंगण वाजविते

पूर्वाच्या पावसाने न्हाणीची धुणी केली
वेंधळ्या वादळाने जीवनी जुनी केली
रस्त्याचे रंग-राव फुंकून फुंक जाते।।

मंजूळ मैना शीळ घालते गोंजारून
बघते रानवल्ली नजर न्याहाळून
चंद्राची चंद्रकला लाजुनी लाजविते।।

तनूच्या तनाईला ताणतो रानवारा
पाटाच्या पैंजणाला झुरतो जीवसारा
प्रीतीच्या पारंबीला पारवा पिंजारते।।

चोचीत चोजवाया चालला खेळ न्यारा
झिंगून पिंगा घाली 'अभय' येरझारा
ऊर्मीच्या उन्नतीने उमेदी उसळते।।

(कविता)

## पैसा येतो आणिक जातो

पैसा येतो आणिक जातो
मला केवळ मोजायला लावतो
कधी लळा लावतो, कधी कळा लावतो ...।।

कधी चिल्लर, कधी नोटा
लाभ कधी, कधी तोटा
येण्यासाठी दारे कमी
जाण्यासाठी लक्ष वाटा
माणसाच्या वचनाला
पाडतो हा खोटानाटा
येताना हा झुकूझुकू
अन्
जाताना धडधड जातो ...।।

माझी पर्स, माझा खिसा
माझ्या तिजोरीला पुसा
त्यांचे हाल असे जणू
एस टी चा थांबा जसा
बस येते, जरा थांबते
अन्
भर्रकन निघून जाते ...।।

कुणी 'अभय', कुणी भयभीत
पैसोबाची वेगळी रीत
कुणा देतो मलमली छत
अन्
कुणाला रस्त्यावर आणतो ...।।

**(कविता)**

## पायाखालची वीट दे....!

पंढरीच्या पांडुरंगा
तुझ्या चरणी ठाव दे
तीर्थप्रसाद काही नको
शेतमालास भाव दे
दुर्दशेने फस्त केल्या
रानाकडे ध्यान दे
शहरावाणी खेडे होईल
असे थोडे ज्ञान दे
हृदयामध्ये राम आणि
मुखामध्ये नाम दे
सूट-माफी-सवलत नको
घामासाठी दाम दे
पाऊस पाणी येऊ दे
शेत माझे न्हाऊ दे
चोच फुटल्या अंकुरांना
दोन घास खाऊ दे
संपत्तीच्या वृद्धीसाठी
लालसेचा रोग दे
शेतीमधल्या कष्टालाही
वेतनवाला आयोग दे
देवा मला चारदोन
सवंगडी धीट दे
हरामींना कुटण्यासाठी
पायाखालची वीट दे
वास्तवाच्या शोधासाठी
डोकं थंडगार दे
लढवैयांच्या लेखणीला
'अभय' आणि 'धार' दे

**(कविता)**

## विठ्ठलाला पिणारा पाहिजे...!

मोहमाया निमालो
पायी पंढरीला आलो
भक्तिरसाच्या प्याल्याला
उबारा पाहिजे
विठ्ठलाला पिणारा पाहिजे ...॥धृ०॥

वेडा कुंभार तो गोरा
जणू भक्तिचा पसारा
देहभान विसरूनी
पायी तुडवित गारा
नामस्मरणाची धुंदी
त्याला चढणारा पाहिजे ..॥१॥

जशी भक्त जनाबाई
दासी विठ्ठलाच्या पायी
आपुलासा देव केला
त्याला दळावया नेई
आत्मभान विसरूनी
त्याला भजणारा पाहिजे ..॥२॥

'अरविंद' गातो जरी
विठ्ठल पांडुरंग हरी
परमार्थाविना भासे
नुस्ती शब्दांची वैखरी
अंतराला करुणेच्या
सात्विक धारा पाहिजे ..॥३॥

(कविता)

## दगा जर दिला

कदाचित कुणी तुज दगा जर दिला
घराबाहेरील जर रस्ता दाविला
तेव्हा तू प्रिये यावे माझेकडे
न संकोचता तू मनाशी जरा, ही
विनंती गडे ...।।धृ०।।

तुला आज माझी गरज ना मुळी
हजारो जीवांचे तुला साकडे
तुझे आज तारुण्य ऐसे जसे
की प्रेमवीरांचा गराडा पडे
हसतील तुला हे जेव्हा आरसे
न भाळेल रुपावर कुणी फारसे
तेव्हा तू प्रिये यावे माझेकडे
जरा ठेव विश्वास मजवर तुला ही
विनंती गडे ....।।१।।

म्हणू प्रेम याला की व्यवहार हा?
करतेस तू जे तुला आवडे
तुडवून पायी तू मम भावना
कसली नशा ही तुला गं चढे
उतरेल जेव्हा तुझी ही नशा
अंधारतील या दहाही दिशा
तेव्हा तू प्रिये यावे माझेकडे
उघडीच असतील 'अभय' ही कवाडे
सदाही गडे ....।।२।।

(कोई जब तुम्हारा हृदय तोड दे... ह्या हिंदी गीताचा मराठी भावानुवाद!)

(कविता)

## इन्सान की नियत

किसी इन्सान को
रोटी खिलाकर
आप एक दिन के
लिए उसका पेट
भर देंगे!

उसी इन्सान को
रोटी कमाने का तरिका
बताने के लिये
आप लंबा चौडा भाषण भी
ठोक देंगे!

लेकिन....
अगर वह कोई काम
करता है, तो उसका उचित
मुआवजा देना आप कतई
स्विकार नही करोगे..!
आपको उसका पसिना
सस्ते मे चाहिये...!!
चाहे वह भुखा मरे
या
सुसाईड करे....!!!

है ना?
जरा अपने गिरेबानमे झांककर
तो देखिये भाईसाब,
कही मै गलत तो नही लिख बैठा??

**(कविता)**

# आला आला चड्डीवाला

आला आला टोपीवाला
त्याने घातलाय घाला
त्याची नजर तिरकी फिरली
ग बाई माझ्याऽऽऽऽऽ
शेतीला द्रिष्ठ लागली ।।धृ०।।
होती ज्वानीत आली ज्वारी
लक्ष्मी येतांना दिसलिया दारी
धनी खुशीत नाचलाय भारी
म्हणे भरतील कोठ्या-वखारी
नजर पडली बुहाऱ्याची
टोपीवाल्या लफंग्याची
अन
ज्वारीला लेव्ही लागली।।१।।
सातासालात एक साल आलं
शेतचांदण कापसात न्हालं
झाड बोंडांनी लगडून गेलं
जणू दुर्भाग्य खरडून नेलं
यानं केली निर्यातबंदी
आणली बाजारात मंदी
अन
कापसाची वाट लागली।।२।।
केवळ मतांच्या जोगव्यासाठी
सारे दाबतात आमचीच घाटी
धनी राबून मरमर मरतो
कधी म्हणतोय आत्महत्या करतो
गेला जुना टोपीवाला
आला नवा चड्डीवाला
अन
आल्याआल्याच नरडी दाबली।।३।।

**(कविता)**

## सूर्य थकला आहे

पहाट जरा चेतलेली पण;
सूर्य थकला आहे
नितळण्याच्या बुरख्याखाली
विस्तव निजला आहे
सारं काही सामसूम, मात्र;
एक काजवा जागत आहे
चंद्रकलेच्या गर्भाराला
भिक्षा मागत आहे

वादळं वारं सुटलंय पण;
वीज रुसली आहे
बुद्धिबळांच्या शय्येखाली
ऐरण भिजली आहे
शिवशिवणारे स्पंदन काही
उधाण मोजत आहे
चिवचिवणाऱ्या चिमणीमध्ये
दीक्षा शोधत आहे

अंगरख्याची सनदी गुंफण
टरटर उसवत जावी
अपहाराची दुर्धर खाई
अनुतापे बुजवत न्यावी
'अभय'तेचे एकेक एकक
ठिणगी शोधत आहे
अनर्जितांच्या पाडावाला
शिक्षा योजत आहे!
श्रमदेवाच्या उत्थानास्तव
शिक्षा योजत आहे!!

**(कविता)**

## पाणी लाऊन हजामत

गुदस्ता पाऊस आलाच नव्हता
कुठं पडला, कुठं पडलाच नव्हता
पीक उगवलंच नव्हतं
जे उगवलं ते जगलंच नव्हतं
जे जगलं ते वाढलंच नव्हतं
जे वाढलं ते फळलंच नव्हतं
निसर्गानंच केली होती! हजामत केली होती!!
बिनापाण्यानं केली होती!!!

सरकार आलं होतं, मुठभर घेऊन आलं होतं
आमच्या हातावर भुरका ठेऊन म्हणालं होतं
घेन्न! आता कसं वाटऽऽऽऽऽते?
आम्ही म्हणालो होतो
मऽऽऽऽऽस्त वाटते! गोऽऽऽऽऽड वाटते!!

पण एक येडं होतं, सर्वांच्या पुढं होतं
मात्र ते मख्ख होतं, ते बोल्लंच नव्हतं
हात काही त्यानं पसरलाच नव्हता...!

औंदा मात्र पाऊस आला
जिकडेतिकडे कहर झाला
डोंगर-दर्‍या हुदडत गेला
छाती फोडून दरवाजा केला
उभं पीक वाहून गेलं
जे वाहवलं नाही ते दबून गेलं
जे दबलं नाही ते कुजून गेलं
जे कुजलं नाही ते सडून गेलं
जे सडलं नाही ते मरून गेलं
निसर्गानंच केली! हजामत केली!!
पाणी लाऊन केली!!!

**(कविता)**

सरकार आलं, मुठभर घेऊन आलं,
आमच्या हातावर भुरका ठेऊन म्हणालं,
घेन्न! आता कसं वाटऽऽऽऽऽते?

आम्ही म्हणालो,
मऽऽऽऽऽस्त वाटते! गोऽऽऽऽऽड वाटते!!

पण एक येडं होतं, सर्वांच्या मागं होतं
हात काही त्यानं पसरलाच नाही...!
मात्र ते मख्ख नव्हतं, आता ते बडबडत होतं
स्वतःशीच पुटपुटत होतं

''च्यामारी! आयला!! च्यामायला!!
जवा-जवा पिकलं, भरमसाठ पिकलं
तवा-तवा ह्यांनी, सस्त्यामधी लुटलं
रुपयाचा शेतमला चार आण्यात नेला
म्हून माहा धंदा घाट्यामंधी गेला
ह्यांच्यापायी लक्ष्मीवर अवदसा आली
गावासंग ग्रामदेवता पुरी भकास झाली''

''हक्काचं टनभर सरकारवर लुटणं
कणभर मदतीची भीक मागत सुटणं''

''अरे छी! अरे थू!! असल्या जिंदगीवर
भिकंपरिस उपास बरा हक्क मिळेपावतर''

येडा असेल तो-तो, 'अभय' बडबडत असतो
मात्र आम्हा शहाण्यांना फरक पडत नसतो

**(कविता)**

## एक होती मावशी

एक होती आई, एक होती मावशी
दोघीही सख्ख्याच
पण मावशी पडली शेतकऱ्याच्या घरात
अन् आई पडली नोकरदाराच्या घरात

एकदा काय झालं.....
मावशी डोंगर चढली अन् पाय घसरून पडली
पडली तर पडली पण कमरेतून मोडली
वयाच्या साठीमधी कसं नशीब फुटलं?
कमरेचं हाड चार जागी तुटलं!

दवाखान्यासाठी घरामधला पैसा नाही पुरला
केथ्या-मेथ्या झाडपत्तीविना इलाज नाही उरला

निदान काही कळले नाही
सांधे काही मिळले नाही
हाडं काही जुळले नाही

कधी रांगली, कधी घुसली
माझ्या मावश्यावर मात्र
कधीच नाही रुसली

शेवटी काय झालं? व्हायचं तेच झालं!
ते यम नावाचं कार्ट वाजा घेऊन आलं!!
राम-नाम सत है, सत बोलो गत है!

**(कविता)**

यंदा काय झालं....
आई जिना चढली अन् पाय घसरून पडली
पडली तर पडली पण कमरेतून मोडली
वयाच्या अंशीमधी कसं नशीब फुटलं?
कमरेचं हाड चक्क चार जागी तुटलं!

एका तासाच्या आत दवाखाना गाठला
पैशाचा पुठ्ठल पाण्यावाणी वाटला
दवाई-सलाईन-गोळ्या-प्लेट्स
खर्च नाही जाणला!
ऑपरेशनसाठी डॉक्टर
राजधानीहून आणला!!

मावशीवाणी आता आई
रांगत नाही, घुसत नाही
केवीलवाणी बसत नाही
खणखण बोलते...!
टणटण चालते...!!

हे मावशे,
मेल्यावर तरी आता 'अभय' पणे वाग
विधात्याले खंबीरपणे ठणकाऊन सांग
तू आता देवावरबी भरोसा नकोस ठेऊ
शेतकऱ्याच्या घरी पुन्हा जन्मास नको येऊ...!!

**(कविता)**

## सिक्वेंस....!

सरकार शेतकरी विरोधी
धोरणे राबवणार
शेतकऱ्यास आत्महत्येला
भाग पाडणार
मग नाना आणि मका
धावत येणार
मयताच्या बायकोला
पंधरा हजार देणार
पेपरामधी मग
बातमी झळकणार
टीव्ही मध्ये स्पेशल
रिपोर्ट दाखवणार
　　　　पंधरा हजारात काय होते?
　　　　बँकांचे कर्ज फिटते?
　　　　सावकाराचा तकादा मिटते?
　　　　निदान व्याज तरी फिटते?
　　　　किराण्याची उधारी फिटते?
　　　　शेतीची लावलागवड होते?
　　　　पीक काढणीचा खर्च भागते?
तेही जाऊ द्या
　　　　तेरवी तरी होते?
　　　　मुलीचे लग्न होते?
परवाचा बळीराजा
कालचा अन्नदाता
आज भिकाऱ्यांच्या रांगेत?
　　　　कुणीच नाही का रे विचारी
　　　　आणि संवेदनाक्षम?
जाऊ द्या, सोडा विषय
　　　　करा बघू नानाला
　　　　सॅल्यूट पटकन ....!!

**(कविता)**

## मैत्र झुलवून बघ

चेहऱ्यावरती खिळू नकोस
आत उतरून बघ
अंतरीच्या झोपाळ्यावर
मैत्र झुलवून बघ

नितळलेल्या तळावरती
विश्वासाचे घर
हाय, हॅलो जाऊ देत
हात घट्ट धर

शर्थ, अटी काही नकोत
खुले-खुले सांग
तेव्हा तुला कळेल माझ्या
हृदयाचा थांग

दिसतो तसा नाही मी
कठोर आणि क्रूर
काळिजाच्या सप्तकाला
अवरोहाचे सूर

देत बसत नाही मित्रा
पुन्हा पुन्हा ग्वाही
पण तू जसा समजतोस
मी तसा नाही

मोजत बसू नकोस मित्रा
स्पंदनाची धग
डोळे मिटून खांद्यावरती
मान ठेवून बघ

चिंता नकोस करू मित्रा
'अभय'तेने तेव
वादळासंगे लढेन मी
इतका विश्वास ठेव

**(कविता)**

# आयुष्याची दोरी

हे सजीवसंख्येचे नियमन करणाऱ्या
मृत्यो,
कधीही, कुठेही आणि कसेही
आयुष्याची दोरी कापून टाकण्याचे
तुझे अधिकार मान्य आहेत मला
पण सन्मानाने मरण्याचे अधिकार
मलाही असावेत की नाही?
हे ''जीवन'' तुझे असले तरी
''मी'' तर ''माझा'' आहे ना?
तुझ्यामुळे आयुष्य सरणार असले तरी
मी मात्र उरणारच आहे. आणि म्हणून...
माझी तुझ्याबद्दल तक्रार नसली तरी
एक छोटीशी नाराजी आहे
आयुष्य छाटण्याबद्दल हरकत नाही,
पण...
पण असा देहाला का छाटतोस रे?
तुकड्यांतुकड्यांमध्ये का वाटतोस रे?
कधी चिंध्या, कधी लगदा,
कधी खाद्य मासोळ्यांचे
आणि कधीकधी तर आरपार
उमटतात छेद गोळ्यांचे
थांबायला नकोत काय हे
प्रताप तुझ्या सापळ्यांचे??

हे एकून
मृत्यू थोडा भांबावला
मग हळूच हसून म्हणाला
''ही तुझी तक्रार की कांगावा?
प्रथम विचार कर की
सल्ला कुणी कोणास सांगावा?
अरे! कृती तुम्ही करता
आणि विकृती माझी म्हणता?
''एक्सलेटर'' दाबण्याआधी
''ब्रेक'' मारणे शिका
वेगासोबतची थांबवा
फालतू अहमिका
ज्याचे हक्क त्याला द्यावे,
लूट थांबायला हवी
नाहीतर अटळ आहे संघर्ष व यादवी
स्वावलंबी झाडावर
बहरल्यात परावलंबी वेली
परावलंबीने स्वावलंबीची
काय गत केली?
सभ्यतेची उत्क्रांती दिशाहीन गेली
म्हणूनच मी आता शस्त्रंपालट केली
अरे माणूस म्हणून जन्मलात
तर माणसावाणी वागा
जरा तरी फुलवून पाहा
सौजन्याच्या बागा.....!!''

**(कविता)**

## दिवाळीच्या हार्दीक शुभेच्छा....!

आयुष्यभर संसारात ‘‘दिवे’’ नाही लावता आले,
मग आजच भरमसाठ पणत्या लावल्याने
असा कोणता प्रकाश पडणार आहे?
प्रपंच्याच्या रहाटगाडग्यात ‘‘उजेड’’ नाही पाडता आला,
मग आजच भरमसाठ फटाके फोडल्याने
असा कोणता गगनचुंबी ‘‘उजेड’’ पडणार आहे?

लक्ष्मीपुजनाचे विचारताय?
मग ऐका,
आता माझ्या घरात असलेली लक्ष्मी
‘‘बँकेच्या मालकीची’’ आहे.
तीची पूजा केली काय नाही काय,
तिलाही तसा काय फरक पडणार आहे?
तिचा ‘‘मालक’’ तिची पूजा करेलच की!
शिवाय
माझ्यावाचून लक्ष्मीचे तरी
कधी काही अडले आहे काय?

आणि तरीही मला
‘‘लक्ष्मीपूजन’’ करावेसे वाटते, पण;
माझे दैवत माझे श्रम आहे
आणि
लक्ष्मीदेवीला ‘‘श्रमाच्या घामावर’’ किंवा
‘‘घामाच्या श्रमावर’’ प्रसन्न व्हायची
भलतीच ॲलर्जी दिसतेय.

***

बळीला पाताळात गाडल्याचा
आनंदोत्सव साजरा करणे म्हणजे दिवाळी!
बरोबर?

**(कविता)**

वर्षभर शेतीला लुटून मिळवलेल्या
''संचयाची'' पूजा करणे म्हणजे दिवाळी!!
बरोबर??
नव्या खातेवहीची औपचारीक पूजा करून नव्या दमाने
शेतीला लुटण्यासाठी शस्त्र पाजवणे म्हणजे दिवाळी!!
बरोबर???
शेतकऱ्याच्या कमरेला धडूतही शिल्लक राहाणार नाही,
अशा सरकारी धोरणांच्या हिरिरीने अमलबजावणीसाठी
लक्ष्मीपुत्रांनी मांडलेले प्रदर्शन म्हणजे दिवाळी!!!
बरोबर????

***

बळीराजाच्या डोक्यावर यंदा निसर्गानेच ''फुलझड्या'' चेतवल्यात
आणि
सरकार बळीराजाच्या बुडाखाली ''फटाके'' फोडायला निघालंय.

***

गरिबीचा क्षय म्हणून
गळफासाला 'अभय'
भाजल्या कोंबडीला कुठे उरते
विस्तवाचे भय?
तुमचे तुम्ही लावा दिवे
आणि करा आरास
आम्ही शोधतोय उकिरड्यावर
लेकरांसाठी घास

तसं हे आमचं बारमाही गाऱ्हाणं
खणखणीत नसते कधीच नशीबाचं नाणं
सरून गेल्या आशा
मरून गेल्या इच्छा
तरीही मात्र म्हणावेच लागते....

सर्वांना दिवाळीच्या हार्दीक शुभेच्छा....!

**(कविता)**

## ‘‘रावणदहनाच्या’’ हार्दीक शुभेच्छा....!

शेतमालाचे भाव वाढले की
आमचा जळफळाट होतो...कारण
आमच्या मनात दडी मारून
बसला आहे एक रावण

आमच्या मनातल्या रावणाला
सीता पळवून न्यायची असते
भूमीतून निपजलेल्या वस्तूंसाठी
किंमत मोजायचीच नसते

आमची मानसिकता रावणीच
संधी मिळताच जागी होणारी
सृजनाला सदैव अशोकवनात
बंदिस्त ठेवू पाहणारी

कधी मरेल हा रावण
तुमच्या-आमच्या मनातला?
आणि कधी होईल मुक्त
बळीराजा रानातला?

रावणी मनोवृत्तीचे दहन व्हावे
अशी बाळगू ‘अभय’ इच्छा
नंतरच देऊ एकमेकांना
‘‘रावणदहनाच्या’’ हार्दिक शुभेच्छा...!

**(कविता)**

## शोकसंदेश

काही संदेश नसतातच.... वाचण्यासारखे
काळजात जाऊन रुततात.... टाचण्यासारखे
सांत्वनाही जिथे ओशाळल्यागत होते....
सारेच घाव नसतात जेव्हा.... सोसण्यासारखे
काही जाऊन रुततात, आत खोलवर....
सारेच व्रण कुठे असतात.... दिसण्यासारखे?
डोळे बधिर अन अश्रू मुके व्हायला लागतात....
सारेच नसते शब्दात.... सांगण्यासारखे

टाळायचे म्हटले तरी काही टळत नाही....
घडते तेच नियतीला मंजूर.... असण्यासारखे
निश्चयाने झेलत जावा येणारा प्रत्येक क्षण....
आणखी असतेच काय 'अभय'.... असण्यासारखे?

भगवंत देवो तुम्हांस खूप खूप बळ
हेच शब्द माझे प्रार्थनेसारखे.....!

ॐ शांती..! शांती..!! शांती..!!!

(कविता)

# तू चांदणन्हाली अप्सरा

तू चांदणन्हाली अप्सरा
मी माती भरलं कोकरु
तुझं नि माझं कसं जुळावं
कसं व्हायचं सुरू ....गडे
तुरुरुरु तुरुरुरु, तुरुरुरु तुरुरुरु .... ?

तू कोकीळ, मी रेडा
मी चटणी, तू पेढा
जगरुढीचे दोन किनारे
मध्ये वाहाते सुसाट वारे
उडाण कशी मी भरू ?
कसं व्हायचं सुरू ....गडे
तुरुरुरु तुरुरुरु, तुरुरुरु तुरुरुरु .... ?

मी पाताळ, तू अंबर
तू नवनित, मी डांबर
इथे उगवतो पळस-धोतरा
तुझी आवडी जाई-मोगरा
मी सांग कसा विस्मरु
कसं व्हायचं सुरू ....गडे
तुरुरुरु तुरुरुरु, तुरुरुरु तुरुरुरु .... ?

तू इंडियाची राणी
मी भारतीय अज्ञानी
अभय उधळणे तुझे चौखूर
इथे चिंतेची सदैव टूरटूर
दरी कशी मी भरू ?
कसं व्हायचं सुरू ....गडे
तुरुरुरु तुरुरुरु, तुरुरुरु तुरुरुरु .... ?

**(कविता)**

## रंगताना रंगामध्ये

यमुनेच्या तिरावर, आवळीच्या झाडावरी
दडुनिया बसला गं, नटवर गिरिधारी
पाहुनिया राधिकेला, गुपचिप कान्हा आला
घेऊनिया पिचकारी, नेम धरितो मुरारी
सोडीयेली धार कशी? सररररर
रंगताना राधा बोले अरररRR
बावरता राधा पळे, असे कान्हुला तो छळे
तरी चुकेचिना लळे, सावळ्याच्या चाळ्यामुळे
मग राधा करुणेने, बोलू पाहे केविलवाणे
रंगलेले रूप म्हणे, आहे मला घरी जाणे

आतातरी थांब ना रे....! कान्हा, आतातरी थांब ना रे....!
अरे थांब गिरिधारी नको मारू पिचकारी,
रंगामध्ये भिजविशी किती रे मुरारी....।।धृ०।।

माळ तुटली कशी? मोती गळले कसे?
कंकण टिचकून हातात रुतले कसे?
कसे ना मला आज कोडे सुटे?
ऐसेकैसे तरंग मनाशी उठे?
मनाशी उठे! मनाशी उठे!!
अरे सांग गिरिधारी केली काय जादूगिरी?
रंगामध्ये न्हाऊनिया का हसतो मुरारी? ...।।१।।

हातून सुटली कशी? घागर पडली कशी?
खोल पाण्यात जाऊनी बुडली कशी?
डोईवरचा पदर खांदी आला कसा?
रंगी रंगताना रंगात रंगला कसा?
रंगला कसा! रंगला कसा!!
अरे सांग गिरिधारी केली काय चमत्कारी?
रंगामध्ये भिजविली साडी चोळी सारी ...।।२।।

रासलीला कशा? तुझे रंग कसे?
साऱ्या गोकुळी आमुचे झाले हसे
रोज येते 'अभय' पाणी भरण्यामिषे
तुझ्याप्रितीचे अजब बुलावे कसे?
बुलावे कसे? बुलावे कसे?
अरे थांब गिरिधारी झाली पुरी प्रितखोरी
रंगामध्ये भिजुनिया तू कोरडा मुरारी ...।।३।।

**(कविता)**

## निसर्गकन्या

चांदणं गारा, श्रावण धारा, वादळवारा प्याली
मेघांची गडगड, विजांची कडकड, ऐकून ठुमकत आली
पावसात भिजली, तरी न विझली, ज्योत मनी चेतलेली
भान हरपली आणि थिरकली, वयाची वलसावली
आली निसर्गकन्या आली, ठुमकत आली, थिरकत आली
...।।धृ०।।

हिरवळ ल्याली, पावसात न्हाली, न्हाऊन चिंबचिंब झाली
मुरडत आली, लचकत आली, लाजून पाठमोरी झाली .... कोरस

निसवता जोंधळा जणू, दाटली तनू, चोळीला भार
उगवती वल्लरी जशी, कांती लुसलुशी, अंग सुकुमार
वनी विहरली, दिशांत फिरली, तरूवर पिंगण घाली...।।१।।

श्रावणाची सर, चाळविते उर, हवा खट्याळ पदराला नेते दूर
वाजले कंगण की कोकिळेची कुहु, पैंजणाच्या सवेला मैनेचा सूर
चिमणी-पाखरू, हरिण-कोकरू, फेर धरी भोवताली ...।।२।।

आसक्त नजर तीक्ष्ण मी, 'अभय' बोलकी, अधर अनिवार
खुणवती पापणी प्रिया, पाश द्यावया, बाहु अलवार
शोधीत भिरभीर, बघुनी दूरवर, मनीच पुलकित झाली ...।।३।।

**(लावणी)**

## गवसला एक पाहुणा

पहाटलेली विभोर लाली
उधाण वारा पिऊन आली
मस्तीतकाया, धुंदीत न्हाया
कशी उतावीळ झाली
गं बाई उतावीळ झाली
मन ऐकेचना, तन ऐकेचना
जाई पुढे, पळते पुढे
सांगू कुणा? मी सांगू कुणा?
सखे गऽऽऽऽऽ
नजरेस माझ्या गवसला एक पाहुणा
सखे गं मला गवसला एक पाहुणा ।।धृ०।।
माझ्या राजाची वेगळीच बात
चाल डौलाची मिशीवर हात
त्याचा रुबाब वेगळा तोरा
तरी चालतोय नाकासमोरा
बघा सूटबूट, कसा दिसतोय क्यूट
लाजाळू कसा, टकमक बघेचना।।१।।
माझ्या गड्याची न्यारी कहाणी
स्पष्ट विचार, साधी राहणी
जुने थोतांड देतो फेकुनी
नव्या जगाचा ध्यास धरूनी
त्याला विसरेचिना, भूल पडेचिना
सगे गं मना, चैन येईचना।।२।।
जरी वरवर दिसतो तामस
आत ह्रदयात दडलाय माणूस
जातो 'अभय' सदा धावून
जनसेवेचे व्रत घेऊन
तोच ठसला मनी, होईल माझा धनी
लावा गं सखे, विड्याला काथ, चुना।।३।।

**(लावणी)**

## भ्रष्टाचाऱ्यास हाण पाठी

कशी झाली देशाची गती, कुंठली मती
लाचखोरीचे पीक आले
भ्रष्ट पुढारी नेते झाले
नोकरशाहीची मस्ती चाले
भ्रष्टाचाऱ्यांचे राज आले, रं जी जी ....।।१।।
एक होता पाटील धांदे, खाण्याचे वांदे
बँकेला गहाण सातबारा
अवदसा होती घरादारा
मग तो सत्तेमध्ये गेला
पाहता मालामाल झाला
कसा हा चमत्कार झाला? रं जी जी .....।।२।।
एक होता गोविंदा रेड्डी, पँट आणि चड्डी
मांडीवर उभी फाटलेली
चप्पल पायात तुटलेली
मग तो नोकरीत गेला
घरी पैशाचा पूर आला
सांगा कुठून पैसा आला? रं जी जी ....।।३।।
गरीबाच्या घरी जन्मला, पदवीधर झाला
वणवण फिरे गल्लोगल्ली
डोनेशन मागे सारे हल्ली
संस्थेमध्ये हर्रासीला
पंधरा लाख भाव झाला
वाली गरीबांस नाही उरला, रं जी जी .....।।४।।
सत्तेचे सर्व दलाल, करती हलाल
लुटीचा सारा बोलबाला
सरकारे खाती तिजोरीला
स्विस बँकेत पैसा गेला
अवकळा आली भारताला
रसातळाला देश नेला, रं जी जी ....।।५।।

**(पोवाडा)**

## बालकविता

अ आ आई
ब ब बाबा
सी फॉर चाचा
ॲन्ड डी फॉर दादा

मराठी भाषा अमुची आई
हिंदी-इंग्लिश सिस्टर ताई
शिकून घेऊ विविध भाषा
सप्त सुरांची जशी सनई

बोर, चिंच, पेरू, आंबे
पितळ, सोने, कथील, तांबे
विविधतेचे दृश्य मनोरम
ज्ञानदीपाची तशी समई

ज्ञान वेचणे कणाकणाने
एकेक पाऊल क्रमाक्रमाने
अर्जन करूया 'अभय' प्रज्ञा
स्वत्व गुणाला करू कल्हई

**(बालकविता)**

# वैश्विक खाज नाही

शृंगारल्या मनाला, वैश्विक खाज नाही
भोगत्व सोडले तर, कसलाच माज नाही

निष्णात सैन्य माझे; पण हारणार नक्की
मोफत लढावयाचा, यांना रिवाज नाही

त्यांच्या कपटनितीला, चिरडून टाकतो मी
धर्मास जागणारा, मी धर्मराज नाही

खाणार काय घंटा? सोने पितळ कि तांबे?
शेतीमधे उद्या जर पिकले अनाज नाही

गावे बकाल आणिक, शहरे सुजून आली
आम्हांस मात्र त्याची, अजिबात लाज नाही

शालेय पुस्तकांनी, मेंदू बधीर केला
बुद्धी भ्रमिष्टतेवर, उरला इलाज नाही

स्वातंत्र्य देवते तू, ये भारतात थोडी
जेथे ‘अभय’ कुणाला, कुठलेच आज नाही

**(गजल)**

## पाहून घे महात्म्या

पाहून घे महात्म्या, इथली शिवार राने
केला भकास भारत, शोषून इंडियाने

तुमचे विचार बापू, गाडून पूर्ण केला
तुमचा बघा पराभव, तुमच्याच वारसाने

चाकू-सुऱ्या प्रमाणे, हातात पेन त्यांच्या
जितके लुटायचे ते, लुटतात कायद्याने

संपूर्ण सातबारा, कोरा करू म्हणाले
भुललेत भाडखाऊ, दिल्लीत पोचल्याने

आसुड उगारणारा, माझा स्वभाव नाही
पण; वेळ आणली या, मग्रूर लांडग्याने

वृद्धाश्रमात आई, गोतावळ्यास झुरते
गायीस मात्र माता, म्हणतात गौरवाने

इतुकेच शोध उत्तर, मातीत राबणाऱ्या
बदलेल भाग्य निव्वळ, तू घाम गाळल्याने?

मुर्दाड शासकांना, सोयरसुतूक नाही
हकनाक तूच मरशिल, गळफास घेतल्याने

शेती कसून दाखव, विद्याप्रचूर तज्ज्ञा
सुटणार प्रश्न नाही, बुद्धी उगाळण्याने

लक्ष्मीस आणखी मी, सांगा किती पुजावे?
नांदूच देत नाही, ही अवदसा सुखाने!

डोक्यास ताण दे तू, अन सोड आत्मग्लानी
काही तरी 'अभय' कर; मुक्ती मिळेल ज्याने

(गजल)

# कळली तर कळवा

दुष्काळाच्या ज्वाळांमध्ये, जपून ठेव नर
गोठवलेल्या बर्फाखाली, अप्सरांचे घर

जबरदस्तीने घुसतो काय, साप कधी सांग
तूच आपल्याच बिळावरती, झाकण नीट धर

यंदा मुद्दल मागू नकोस, फुकट केळी ने
कामात येईल कधी काळी, गरज पडली जर

भिडाच एकदा निग्रहाने, बाकी बघू मग
कोण लोळणार खाली आणि, कोण चढेल वर

स्मशानातल्या मसन्याउदास, कुठे काय वर्ज्य
मेल्यावरती मर नाहीतर, जिवंतपणी मर

किती उपडणार आहेस तू, बस इतके ठरव
रोज वाढणाऱ्या धस्कटास, 'अभय' असेल तर

(गजल)

## मढे मोजण्याला

लपेटून फासामधी, कायद्याला
ससे वाकुल्या दावती पारध्याला

नको पाडसा आज कळपास सोडू
चुल्हा तप्त टपला तुला रांधण्याला

जवानीत होता उतावीळ श्रावण
अता फागही ना विचारीत त्याला

तुझी आत्मग्लानी वृथा-व्यर्थ आहे
कुणी येत नाही मढे मोजण्याला

करा की नका काम कोणी पुसेना
बिले चोख ठेवा; लुटा आंधळ्याला

इथे देवळाच्या चिखल भोवताली
स्मशाने चकाचक 'अभय' तालुक्याला

**(गजल)**

## चुलीमध्ये घाल

मेघ भरजरी आठवणींचे, दाटून आले काल
नयनामधे आली त्सुनामी, वाहून गेले गाल

जाता जाता हळू घातली भुवई उचलून साद
या चिमणीच्या चोचीसाठी दाणा घेऊन याल?

बोल बोबडे मर्दुमकीचे बोलून झाले फार
असेल जर का तुझ्यात हिंमत हाती घे तू मशाल

कर्ज काढुनी कशास शेती कसतोस मित्रा सांग
येडपटांचा येडा धंदा कुत्रं खाईना हाल

साहित्याचा खेळ गारुडी तेजीत आला फार
पराजितांचे अश्रू विकुनी झालेत मालामाल

या मातीचा लोळ एकदा क्षितिजे भेदुनी मार
चिंब न्हाऊ दे दिगंताला रंग दे लालीलाल

'अभय' देईना पोशिंद्यास; वाचू कशाला सांग?
तुझे प्रबंध तुपात घोळून चुलीमध्ये तू घाल

**(गजल)**

# एक केवळ बाप तो

तापणारा तापतो अन मजवरी संतापतो
मी खुबीने ताप त्याचा धस्कटाने मापतो

तापल्या मातीकुतीला या ढगांची ओढणी
ओढताना ओढणीला सूर्यही मग धापतो

अंतरात्म्याचा दुरावा वाढला जर फार तर
अंतराला अंतराच्या अंतराने कापतो

वाचणारा वाचतो पण: का, कशाला, जाणतो?
वाढवाया आत्मगौरव छापणारा छापतो?

आसवांच्या आसवांना धीर द्याया धावतो
निर्भयाला अभय ज्याचे एक केवळ बाप तो

**(गजल)**

# नाटक वाटू नये

थुंकली थुंकी पुन्हा पुन्हा, उगीच चाटू नये
नाटक सुद्धा असेच वठव की, नाटक वाटू नये

लाख उमटू दे देहावरती, आपुलकीची चरे
पण इवलेसे काळीज माझे, तितुके फाटू नये

नकोस दाखवू दिव्य धबधबे, अत्तरवर्णी झरे
मी मागत नाही फार परंतु; पाझर आटू नये

वरून सांत्वन, आतून चिमटा; नाद तुझा वेगळा
जाणीव इतकी तरी असू दे, मैतर बाटू नये

सपाट टक्कल चमचमी माझे, लोभसवाणे जरी
संधी मिळाली म्हणून त्यावर, पोळी लाटू नये

पिकल्या फळांनी लदबदलेले, रान जरी मोकळे
हवे तेवढे भरपूर खावे, फुटवे छाटू नये

सगे-सोबती गाळून घे तू, 'अभय' घप्प मनाने
बिनकाम्यांची अवतीभवती, गर्दी दाटू नये

(गजल)

# संक्षिप्त परिचय

**नाव** : **गंगाधर महादेवराव मुटे**
**जन्म** : २७ फेब्रुवारी १९६२
**शिक्षण** : बी.एससी (गणित)
**व्यवसाय** : मुक्त पत्रकार, शेती, शेतीविषयक संशोधन, बिजोत्पादन आणि विपणन, कापसाच्या अनेक संकरित वाणांची निर्मिती
**संपर्क पत्ता** : मु.पो. आर्वी (छोटी) ता. हिंगणघाट जि. वर्धा - ४४२३०७
**ई-मेल** - ranmewa@gmail.com

## प्रकाशित साहित्य

**१)** रानमेवा (काव्यसंग्रह) नोव्हेंबर २०१०
**२)** वांगे अमर रहे (ललित लेख संग्रह) जुलै २०१२
**३)** नागपुरी तडका **E-book** (काव्यसंग्रह) फेब्रुवारी २०१३
**४)** माझी गजल निराळी (गजलसंग्रह) नोव्हेंबर २०१३
**५)** महाराष्ट्र टाईम्स, लोकमत, तरुण भारत, सकाळ, लोकसत्ता, देशोन्नती व अन्य विविधवृत्तपत्रातून सातत्याने लेखन.
**६)** विविध नामांकित दिवाळी अंकातून अनेक कविता प्रकाशित.
**७)** पुणे, नाशिक व औरंगाबाद येथून प्रकाशित होणाऱ्या शेतकरी संघटनेचे मुखपत्र असलेल्या पाक्षिक **शेतकरी संघटक** मध्ये **वाङ्मयशेती** हे नियमित सदर लेखन

## ई-लेखन

**1)** www.sharadjoshi.in
**2)** www.baliraja.com
**3)** www.gangadharmute.com
**4)** gangadharmute.wordpress.com
**5)** gangadharmute.blogspot.com

या संकेतस्थळांची निर्मिती आणि त्यावर सातत्यपूर्ण लेखन.

**फेसबूक** : www.facebook.com/gangadharmute
**फेसबूक पेज** : www.facebook.com/my.net.farming (माझी वाङ्मयशेती)

## पुरस्कार

**१)** स्टार माझा/ए.बी.पी. माझा या लोकप्रिय मराठी TV वृत्तवाहिनीतर्फे आयोजित **ब्लॉग माझा** या जागतिक पातळीवरील स्पर्धेत २०१० आणि २०१२ मध्ये gangadharmute.wordpress.com या ब्लॉगला सलग दोनदा विश्वस्तरीय पुरस्कार

**२)** मेहता पब्लिशिंग हाऊस आणि मी मराठी डॉट नेट संयुक्त विद्यमाने आयोजित आंतरजालीय स्पर्धेत **वांगे अमर रहे** या ललितलेखाला पारितोषिक

**३)** मी मराठी डॉट नेट, द्वारा आयोजित आंतरराष्ट्रीय पातळीवरील कविता स्पर्धा-२०११ या स्पर्धेत **कुठे लुप्त झाले फुले भिम बापू** या कवितेस प्रथम पुरस्कार

**४)** २०१३ मध्ये दर्यापूर येथे भरलेल्या ५२ व्या अ.भा. अंकूर मराठी साहित्य संमेलनात साहित्यक्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल **अंकूर वैभव** पुरस्कार व सन्मानचिन्ह देऊन गौरव.

**५) माझी गजल निराळी** गजलसंग्रहाला अंकूर वाङमय पुरस्कार-२०१३ चा स्व. सुरेश भट स्मृती पुरस्कार.

**६)** शेतीक्षेत्रात उल्लेखनीय कामगिरीबद्दल ठाणे येथील जनादेश २०१५ चा पुरस्कार

## सामाजिक कार्य

**१९८२** पासून शेतकरी चळवळीत सक्रीय सहभाग. अनेकदा तुरुंगवास

**१)** १० जुलै २०१४ पासून स्वतंत्र भारत पक्षाच्या महाराष्ट्र प्रदेश महासचिव पदावर कार्यरत

**२)** जुलै २०१० पासून शेतकरी संघटनेचे वर्धा जिल्हा अध्यक्ष म्हणून कार्यरत

**३)** नोव्हेंबर २०१४ पासून अ.भा.शेतकरी मराठी साहित्य चळवळीच्या संस्थापक अध्यक्षपदी कार्यरत.

**४)** २८ फेब्रुवारी व १ मार्च रोजी वर्धा येथे आयोजित पहिल्या अ.भा. शेतकरी साहित्य संमेलनाचे कार्याध्यक्ष म्हणून कार्यभार.

## संपादकीय कार्य

**१)** १२ व्या शेतकरी संघटनेच्या संयुक्त अधिवेशनानिमित्ताने प्रकाशित करण्यात आलेल्या **पुन्हा एकदा उत्तम शेती** या स्मरणिकेसाठी कार्यकारी संपादक म्हणून कार्यभाग.

**२)** वर्धा येथे आयोजित पहिल्या अ.भा.शेतकरी साहित्य संमेलनानिमित्त प्रकाशित **सारस्वताचा एल्गार** स्मरणिकेचे संपादन.

***



गंगाधर मुटे यांच्या नागपुरी तडक्यात केवळ भाषेचा फुलबाग नाही. काळजाची आग आहे. उपाशी शेतकऱ्याच्या पोटात खवळणाऱ्या ॲसिडमधल्या या कविता आहेत. विदर्भातल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्यांवर अश्रू गाळणारं भरपूर लिखाण आजवर झालंय. ''बिचारा शेतकरी'' असंच विदर्भातल्या शेतकऱ्याचं वर्णन इतर लेखक कवी करतात. मनापासून त्यांना त्याच्या दुःखाची संवेदना जाणवते यात वाद नाही; पण गंगाधर मुटेंच्या कवितेत हाच शेतकरी हात पसरून नाही तर मुठी आवळून येतो. वाकून नाही तर ताठ मानेने येतो. गुंडा नसतो तरीबी पन, गुंड्यावानी वागतो. त्यांची जनता बिचारी नाही तर विचारी आहे आणि ती अविचारी होण्यापुर्वी पिळणाऱ्यानी आणि गिळणाऱ्यानी सावध व्हावे असा इशारा ती घेऊन येते. त्यांचा शेतकरी पुढाऱ्यांना खणखणीत दणके घालणारा आहे.

गंगाधरजींच्या कविता मरगळलेल्या शेतकऱ्याला स्फूर्ती देणाऱ्या आहेत. या कविता केवळ आरामखुर्चीतलं वाचन नाहीत. भविष्यकाळाला घडवण्याची ताकद असलेल्या जनसंमर्दाला झोपेतून जागं करणाऱ्या आहेत. आपल्याला त्या नक्की आवडतील, याची खात्री आहे.

-ई साहित्य प्रतिष्ठान, ठाणे